आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २७ फेब्रुवारी २०२४



विजयासाठी कविता माझी
कधीच नव्हती, म्हणून नव्हती
भीती तिजला पराजयाची,
जन्मासाठी हटून केव्हा नव्हती
बसली, म्हणून नाही खंतही
तिजला मरावयाची

# मराठी भाषा... अभिजात भाषा

आधुनिक केसरी न्यूज

**कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून शासनातर्फे महाराष्ट्रात साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने मराठी भाषेची थोरवी सांगणारा हा लेख.**

भाषा हे संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. माणूस हा आपला मातृभाषेतूनच अधिक प्रभावीपणाने अभिव्यक्त होतो. भाषा हे केवळ शब्दाचे संकलन नसते, तर माणसांच्या वैचारिक जीवनाला अखंडपणाने नवी ऊर्जा, नवी शक्ती, नवी दिशा व नवा आकार देणारी ही एक महाशक्तीच असते. भाषा हा एक इतिहास असतो, एक संस्कृती असते. ती एक अस्मिता असते. भाषेत स्वातंत्र्य आणि गुलामगिरीची चीडही असते. भाषा हे एका जीवनाचे दर्शन असते. संस्कृत भाषा देवे केली ! प्राकृत काय चोरांपासून झाली ? असा संतप्त प्रश्न संत एकनाथांनी विचारला होता. अशी ही मराठी भाषा महाराष्ट्राची राजभाषा आहे. मराठी भाषेतील वाङ्मयाला एक प्रदीर्घ ऐतिहासिक व गौरवशाली परंपरा आहे. मराठी भाषेतील वाङ्मय श्रेष्ठ दर्जाच्या वैभवाने आणि अनेक बोलींनी सजलेले आहे. सर्वज्ञ चक्रधर स्वामी, संत ज्ञानेश्वर आणि इतर अनेक संत, विचारवंत, लेखकांनी मराठी भाषेची थोरवी यापूर्वीच स्पष्ट केली आहे. 'लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी', अशा या शब्दात सुरेश भट यांनी मराठी भाषेचा अभिमान अक्षरबद्ध केलेला आहे. जगातील सगळेच ज्ञान इंग्रजीत असल्याचा आपला भ्रम आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि जागतिकीरणाच्या या युगात इंग्रजी भाषेचे जागतिक महत्त्व आपणास नाकारता येत नाही. तसेच भारताची संपर्क भाषा म्हणून हिंदी भाषेचे महत्त्व आहे आणि माणसांच्या समग्र जडणघडणीत आपल्या मराठी मातृभाषेचे अनन्य साधारण महत्त्वही तितकेच महत्त्वाचे आहे.

जागतिकीकरणाच्या युगात मराठी भाषा ही जागतिकीकरणाची आव्हाने स्वीकारत ती आपले अस्तित्व टिकवून आहे, म्हणून मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून जगासमोर येत आहे. भारतीय संविधानाच्या आठव्या परिशिष्टात ज्या बावीस भाषांचा प्रमुख उल्लेख आहे, त्यात मराठी भाषेचा समावेश आहे. जगात साधारणतः जवळपास सहा हजार प्रमुख भाषा बोलल्या जातात, या एकूण जागतिक भाषेच्या क्रमवारीत संस्कारात्मकदृष्टीने मराठी भाषेचा पंधरावा क्रमांक लागतो, तर भारतात प्रामुख्याने मराठीचा चौथा क्रमांक लागतो.




भारतातील 35 राज्य व केंद्रशासीत प्रदेशातील अनेक विद्यापीठात मराठी भाषा, वाङ्मय व संशोधन विभाग कार्यरत असून या प्रदेशात मराठी भाषा प्रामुख्याने बोलली जाते. त्याशिवाय विशेष म्हणजे जगातील सुमारे 75 ते 80 देशांत मराठी भाषा बोलली जाते. यावरून मराठी भाषेची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्याप्ती आपल्या लक्षात येते. मराठी भाषा ही केवळ महाराष्ट्र प्रदेशाची प्रांतिक भाषा नाही, तर ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषा आहे.


मराठी भाषा महाराष्ट्राची 2500 वर्षांपूर्वीची भाषा असल्याचे अनेक लिखित पुरावे दिसून येतात. इ.स.पूर्व दुसऱ्या शतकातील सातवाहनाच्या राजवटीत भारताच्या अनेक भूप्रदेशात मराठी भाषा प्रचलित होती. पुणे जिल्ह्यातील सुन्नर येथील नाणेघाटाचा शिलालेख हा मराठी भाषेतील पहिला ब्राह्मी लिपीतील शिलालेख असून तो 2220 वर्षांपूर्वीचा आहे. या शिलालेखात महारठिनो असा उल्लेख आढळतो. महाराष्ट्री भाषेतील गाथासप्तशती हा पहिला ज्ञात आद्य ग्रंथ होय. इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून मराठी भाषेच्या निर्मितीचा काळ भाषा तज्ज्ञांनी मान्य केलेला आहे. प्राचीन महारठ्ठी, मरहठ्ठी, महाराष्ट्री प्राकृत भाषा आणि अपभ्रंश मराठी असा मराठी भाषेचा प्रवास झाल्याचे दिसून येतो. महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश आणि मराठी या तीन वेगवेगळ्या भाषा नसून ती सामान्यपणे मराठी या भाषेची तीन रूपे असल्याचे स्पष्ट होते. मराठी भाषेतील अनेक प्राचीन शिलालेख, ताम्रपट, पोथ्या, धर्मग्रंथ, हस्तलिखित ग्रंथ या सर्व पुराव्यावरून मराठी भाषा ही सामान्यपणे 2500 वर्षापूर्वीची भाषा असल्याचे स्पष्ट होते.

मराठी भाषेचा उगम संस्कृत भाषेच्या प्रभावाखाली झाला असला, तरी संस्कृत भाषेला संस्कृत हे नाव मिळण्याआधीच महाराष्ट्री भाषा या नावाने मराठी भाषा अस्तित्वात होती. म्हणून मराठी भाषा ही संस्कृत भाषेची मुलगी नाही, तर ती बहीणच ठरते. विवेकसिंधू व लीळाचरित्र हे मराठी भाषेतील प्राचीन ग्रंथ आहेत. उद्योतनसूरी यांनी इ.स.778 मध्ये लिहिलेल्या कुवलयमाला या प्राचीन ग्रंथात अठरा देशी भाषांचा उल्लेख आहे. सोमेश्वरकृत मानसोल्लास या 11 व्या शतकातील ग्रंथात मराठी भाषेची पद्य रूपे आढळतात. जैन पंडित यशश्चंद्र यांच्या राजमतीप्रबोध या संस्कृत नाटकात मराठी भाषेतील उतारा आढळतो. रामायण, महाभारत व बृहत्कथेत अनेक मराठी शब्द आहेत. अक्षीचा शिलालेख हा श्रवणबेळ गोळच्या शिलालेखाहून सुमारे शंभर वर्षांनी प्राचीन आहे. महाराष्ट्री हे एका प्राकृत भाषेचे नाव इसवी सनाच्या प्रारंभी माहिती होते, त्यानंतर पुढे देशाचे नाव म्हणून प्रचारात आले असावे असे भाषातज्ज्ञ मानतात. सुमारे 2250 वर्षांपूर्वीच्या विनयपिटक, या पाली भाषेतील बौद्ध धर्मग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख आढळतो.

भारतातील अभिजात भाषेच्या मालिकेत आपणास मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून मान्यता द्यावीच लागते. भारतातील संस्कृत, तमिळ, तेलुगू, ओडिया, कन्नड व मल्याळम या भाषांना भारत सरकारने अभिजात भाषा म्हणून मान्यता दिलेली आहे. आता मराठी भाषा ही केंद्र शासनाच्या अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण केले आहेत. या निकषात मराठी भाषेने आपले दोन हजार वर्षांपूर्वीच्या भाषेचे प्राचीनत्व, भाषेची मौलिकता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूषण, भाषेचे प्राचीन रुप व आधुनिक रूप मराठी भाषेने यापूर्वीच सिद्ध केले आहे, म्हणून मराठी भाषा ही भारतातील एक प्रमुख अभिजात भाषा आहे, हे निर्विवादपणे स्वयंसिद्ध झाले आहे. इसवी सनाच्या सुमारे नवव्या शतकापासून देवनागरी लिपीचा प्रारंभ मानला, तरी शके 982 चा ताम्रपट आणि श्रवणबेळगोळ व पंढरपूर यासारख्या अनेक ठिकाणांचे शिलालेख हे मराठी भाषेच्या प्राचीनत्वाची साक्ष देतात. जगातील मानवी प्राण्यांच्या इतिहासामध्ये भाषांचा इतिहास हा सामान्यपणे पाच लाख वर्षांचा मानला जातो, तर भाषा ही लिपीच्या स्वरुपातील तिचे वय सामान्यपणे पंधरा हजार वर्षांपर्यंतचे मानले जाते. भारतातील 1961 च्या जनगणनेत 1652 मातृभाषेची यादी दिली होती, त्यात 300 आदिवासी मातृभाषांचा उल्लेख आहे. त्यानंतर 1971 च्या जनगणनेच्या यादीत फक्त 108 भाषांचा उल्लेख आला आहे आणि 109 व्या क्रमांकास अन्य भाषा असा उल्लेख करण्यात आला आहे. याचा अर्थ भारत आणि जगातील अनेक मातृभाषांची अवस्था ही मरणकळा स्वरुपात आलेली आहे. जागतिक भाषातज्ज्ञ डॉ. क्रिस्टल वेल्स यांच्या मतानुसार इ.स.1990 च्या पूर्वी इंग्रजी ही जागतिक भाषा नव्हती, पण राजकीय, वैज्ञानिक, आर्थिक आणि सांस्कृतिक या चार शक्तींमुळे जगातील लोक इंग्रजी भाषेचा वापर करतात. जगातील सर्व देशातील भारत हाच एकमेव देश हा आपल्या देशातील 26 भाषांमध्ये साहित्य प्रकाशित करतो. देशातील साधारणतः 30 टक्के ग्रंथालये ही एकट्या महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रातील ग्रंथाची वार्षिक बाजारपेठ ही सुमारे 300 कोटींच्या आसपास आहे, म्हणून आपण सर्वांनी आपआपल्या भाषेच्या रक्षणाबरोबरच तिचे संवर्धनही केले पाहिजे. कारण भाषा ही एक संस्कृती असते. म्हणूनच आपण मराठी भाषेची अस्मिता, परंपरा आणि संस्कृतीची विविधता राखणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यकारभाराची सत्ता ज्यांच्या हातात आहे, त्यांनी महाराष्ट्राच्या राजभाषेत राज्यकारभार करावा. सर्व भारतीयांना कायदा समजावा हा नैसर्गिक न्याय आहे, म्हणून कायद्याची पुस्तके मराठी भाषेत अनुवादित करावीत. कायद्याची पुस्तके इंग्रजीत असल्यामुळेच देशातील नागरिकांमध्ये कायद्याविषयी प्रचंड अज्ञान आहे. सक्षम अभिव्यक्ती व उच्च शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषेतून असावे. जागतिकतेचे आव्हान स्वीकारण्याची ताकद मराठी भाषेत आहे. अलिकडेच युनोस्कोने आपआपल्या भाषा सांभाळा, असे जगाला आवाहन केले आहे. त्यामुळे मराठी माणसांनी इतर कोणत्याही भाषांचा वैर वा द्वेष न करता मराठी भाषा सांभाळत तिचे रक्षण आणि संवर्धन करणे गरजेचे आहे. भारतीय जनगणना संचालनालयाच्या एका ताज्या अहवालानुसार भारतातील 1635 शास्त्रीयदृष्ट्या भाषा असून यातील सुमारे चाळीस भाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. मराठी माणसांनी मराठी भाषेच्या लुप्ततेची भीती न बाळगता भाषाभिमान अंगिकृत करून तिच्या संवर्धनासाठी क्रियाशील योगदानाची गरज आहे. 27 फेब्रुवारी हा दिवस कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीचा दिवस आहे. याचदिवशी भारत सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन महाराष्ट्र, भारत आणि जगातील मराठी माणसांचा, मराठी अस्मितेचा, मराठी परंपरेचा आणि मराठी संस्कृतीचा गौरव करावा ही अपेक्षा !




**डॉ. माधव बसवंते**
प्रभारी प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड
भ्रमणध्वनी : 9404900318
ईमेल- MADHAVGBT@GMAIL.COM




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## आनंदाची फुले वाटणारे झाड...



आधुनिक केसरी

आणि नंतर घडले ते सगळे अद्भुत ! मुलांच्या कलागुणांवर पुलं अफाट भाळले. त्यांनी मुलांना मग पेटी तर वाजवून दाखवलीच, पण त्यांना जे जे हवे ते सगळे केले. एवढे करून पुलं थांबले नाहीत. त्यांनी त्या मुलांच्या कलागुणांचे कौतुक वर्तमानपत्रात लेख लिहून केले. शिवाय आपल्या पुढाकाराने त्या मुलांचा कार्यक्रम पुण्यात घडवून आणला. मुलं आणि पुलं यांची झकास गट्टी जमली. मुलांचे ते आवडते ' भाईकाका ' झाले. असे होते पुलं . जेवढे साहित्यिक म्हणून मोठे, तेवढेच माणूस म्हणूनही.

एकदा पुलंच्या वाढदिवसाच्या दिवशी एक पत्रकार त्यांची मुलाखत घ्यायला त्यांच्या घरी गेला. काही प्रश्न विचारल्यानंतर ' तुमच्या जीवनातील सर्वात आनंदाचा क्षण कोणता ' असे त्याने पुलंना विचारले. काही क्षण पुलं शांत होते. पत्रकाराला वाटले की बहुधा त्यांना काय सांगावे हा प्रश्न पडला असेल. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याचा क्षण, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याचा क्षण इ पैकी कोणता सांगावा असा त्यांना प्रश्न पडला असेल. तो काही बोलणार तेवढ्यात पुलं म्हणाले, ' एकदा माजी पंतप्रधान इंदिराजी आपल्या मंत्रिमंडळासमवेत चर्चा करीत होत्या. त्या म्हणाल्या की आपल्या देशातले जे महान लोक होऊन गेले , त्यांचा सन्मान तर आपण टपाल तिकीट काढून करतोच, पण एखाद्या परदेशातील व्यक्तीवर तिकीट काढून त्यांचा सन्मान करावा असे वाटते. त्यांचे सहकारी म्हणाले की छान कल्पना आहे. कोणाचे नाव आपल्या डोळ्यांसमोर आहे का ? तेव्हा इंदिराजी म्हणाल्या जगाला हसवणाऱ्या आणि काही काळ का होईना पण आपले दुःख विसरायला लावणाऱ्या चार्ली चॅप्लिनवर तिकीट काढावे असे वाटते. ' वा. फारच छान कल्पना ! ' सहकारी म्हणाले. तेव्हा एका मंत्र्याने विचारले की कोणाच्या हस्ते हे तिकीट प्रकाशित करावे असे आपल्याला वाटते ? तेव्हा इंदिराजी म्हणाल्या, ' तो महाराष्ट्रातला पी एल आहे ना, लोकांना आपल्या नर्मविनोदाने हसवणारा, त्याच्या हस्ते हे तिकीट प्रकाशित करावे असे वाटते. ' पुलं त्या पत्रकाराला म्हणाले , ' तो माझ्या जीवनातला परमोच्च आनंदाचा क्षण ! '

एकदा पुलंना कोणीतरी तुम्ही आत्मचरित्र कधी लिहिणार असे विचारले होते. तेव्हा पुलं म्हणाले, ' मी आत्मचरित्र लिहीन की नाही हे माहिती नाही, पण लिहिलेच तर त्याचे नाव ' निघून नरजातीला रमविण्यात गेले वय ' असे असेल असे सांगून टाकले. आपल्या साठ वर्षांच्या जगण्याचे मर्म अशा रीतीने पुलंनी एका ओळीत सांगून टाकले होते. असे हे आनंदाची फुले वाटणारे झाड..!



## आनंदी पहाट

# मनाला सज्जन व सज्ज ठेवावे

आधुनिक केसरी

आपल्यापैकी प्रत्येकजण दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस करून दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असतो. सद्यःस्थितीत आपल्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वप्रथम अर्थार्जन अनिवार्य झाले आहे. तसे बघितले तर अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही मुलभूत गरजांची पूर्तता शरीरासाठीच होत असते. पण मनाचे काय? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे आपले आयुष्य वेगळे असल्याची प्रचीती येत असते. अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जात असते. परंतू आपल्या मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून, मनपसंद असा कधी विचार खरेच होतो का? निदान तसे अनेकांच्या बाबतीत दिसत तरी नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवत असते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देत असते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला आपण स्थिर करू शकतो, पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते. मनाचा विचार न करता केवळ कोणत्यातरी अनावश्यक बाबींचा अनावधानाने विचार करणे ह्यामध्ये सुरु होत असते. काही प्रमाणांत अशी व्यक्ती आत्मकेंद्रित झाल्याचा आपल्याला प्रत्यय येऊ लागतो. अशा व्यक्तींच्या अंतर्मनांत सुरु असलेल्या वैचारिक प्रक्रियेत अनाठायी विचारांचा कल्लोळ माजलेला असतो. त्यांच्या शरीर आणि मन ह्याचा मिलाफ होणे शक्य होत नाही. मनातील विचार आणि शरीराचे वर्तन ह्यांचा परस्परांशी संबंध राहिलेला नसतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी


## वृंदावनी छाया | विठ्ठलाची ||

लाभता जीवाला | सद्गुरूचा संग ||
होई कैसा भंग | समाधिचा ? ||१||
उत्तम विचार | उत्तम आचार ||
व्हावा सदाचार | हाचि देवा ||२||
कष्टाची मिळावी | पोटाला भाकर ||
होऊने चाकर | दांभिकांचा ||३||
अंगणी भरावा | संताचा मेळावा ||
श्रीरंग खेळावा | उंबऱ्यात ||४||
सांजवात गाते | तुळशीची माया ||
वृंदावनी छाया | विठ्ठलाची ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगूज





गुरुमाऊली प. पू. अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

### ईश्वरत्वाची प्रचिती


श्री स्वामी समर्थ भाविकांनो, अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त भगवान ज्ञानाचे सगुण, साकार रूप, योगाची सजीवता, सर्वसिद्धींचे माहेरघर, चराचरा विषयीचा निर्हेतूक कळवळा आहेत. सर्व ब्रम्हांडाचे गुरुपद घेतलेल्या श्री दत्त महाराजांचा अवतार अन्यायाचा अंधार नाहीसा करून ज्ञानाच्या प्रकाशात ईश्वरीय गुणांचे संवर्धन करण्यासाठी झाला आहे आणि म्हणूनच विविध उद्धारक शक्ती एकवटल्या आहेत. भगवान ब्रम्हदेव नित्य नव्या संरचनांचा, सृष्टीचा निर्माण करणारे,श्रीविष्णू प्रतिपाळ, कल्याण करणारे, श्री शिव भगवान त्यातल्या चेतनांचे रक्षण करून असत, अमंगळाचा संहार करणारे, हे तीन देव एकवटून दत्त रूपात अवतीर्ण झालेत. ही बाब सूक्ष्म अर्थ उद्घाटित करणारी आहे. श्री दत्त महाराज अध्यात्माचे प्रतिबिंब आहेत.भारतीय अध्यात्म जीवा शिवाच्या मिलनाने पूर्ण होते. हे अद्वैत, पूर्णऐक्य होण्यासाठी साधकाची यात्रा यंत्र, मंत्र, तंत्राचा अवलंब करीत समृद्ध होत जाते.ही तीन साधने देवतांची अधिष्ठाने आहेत. यंत्राच्या त्रिकोणादि रेखाकृती ब्रह्मदेवाच्या चैतन्याची खूण आहेत. मंत्रादि अक्षरातून अभिव्यक्त प्रसारित होणाऱ्या नादात्मक लहरीतून श्री विष्णूचे मांगल्य प्रसारण पावते. तंत्रातून दैनंदिन दुखांचा परिहार करीत शिवाची कल्याण कामना मायेचा परिहार करते. सत+चीत +आनंद, सत+शिव+ सुंदर याचे अद्भुत संमिश्रण अनुभवणे म्हणजे ईश्वराची प्रचिती घेणे.ही प्रचिती श्री दत्त महाराजांच्या सेवा भक्तीतून अनुभवायला मिळते.श्री दत्त महाराजांनी सृष्टीशी ज्ञानानुसंधान कसे बांधावे हे विशद करण्यासाठी आपल्या अवतारा काळात 24 गुरू केले होते. या विश्वातल्या लहानात लहान गोष्टी मधून बोध कसा घ्यावा, गुणग्राहकता,बोधात्मकता, निर-क्षिर -विवेक -चातुर्य कसे असावे, या त्यांच्या गुर कथेतून व्यक्त झाले आहे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आज्ञा स्वाधिष्ठान है,
मणिपूरक को जान ।
मूलाधार विशुद्ध है, चक्र अनाहत मान
।।२८।।(स्वर्वेद तृतीय मण्डल द्वितीय अध्याय) ०३/०२/२८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूरक, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञा – ही सहा चक्रं आहेत आणि उर्वरित चक्रांचं वर्णन खालील दोह्यात आहे. ही सर्व मिळून आठ चक्रं आहेत, ज्याचे ज्ञान योगी पुरुषांना असते.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# निरभिमानी परोपकार ही भगवंताची सेवाच

आधुनिक केसरी



प्रत्येक मनुष्याला परोपकाराची बुद्धी असणे अत्यंत जरूर आहे. पण तो कुणाला शक्य आहे आणि कुणी करावा, याचा विचार करायला पाहिजे. ज्या शेतात पाणी भरपूर पुरून उरत असेल त्याच शेतातले पाणी बाहेर टाकता येते, आणि ते हितावहही होते. इतर शेतांच्या बाबतीत हे होत नाही; अशा शेताला पुरेसे पाणी कसे मिळेल याचाच आधी विचार करणे जरूर आहे. हीच दृष्टी परोपकार करणाऱ्या व्यक्तीने ठेवावी. ज्या महात्म्यांनी स्वतःचा उद्धार करून घेऊन, जगाच्या कल्याणाकरिताच जन्म घेतला, त्यांनाच परोपकाराचा अधिकार. मग प्रश्न असा येतो की, इतरांनी परोपकाराची बुद्धी ठेवू नये आणि तसा प्रयत्नही करू नये की काय ? तर तसे नाही. परोपकाराची बुद्धी आणि प्रयत्न असणेच जरूर आहे. परंतु परोपकार म्हणजे काय, आणि त्याचा दुष्परिणाम न होऊ देता तो कसा करता येईल, हे पाहणे आवश्यक आहे. भगवंताची सेवा या भावनेने दुसऱ्याकरिता केलेली मेहनत याला परोपकार म्हणता येईल, आणि त्यापासून नुकसान होण्याची भीती नाही. परंतु हे वाटते तितके सोपे नाही; कारण मनुष्याची सहज प्रवृत्ती अशी की, थोडेसे काही आपल्या हातून झाले की, ‘ ते मी केले, मी असा चांगला आहे ’, अशा तऱ्हेचा विचार येऊन तो अभिमानाला बळी पडतो. सबब, ज्या ज्या वेळी दुसऱ्याकरिता काही करण्याची संधी मिळेल, त्या त्या वेळी तिचा फायदा घेऊन मनाला अशी शिकवण द्यावी की, ‘ देवा, तुझ्या सेवेचा लाभ मला दिलास ही माझ्यावर कृपा झाली. अशीच कृपा ठेवून आणखी सेवा करून घे. ’ ही विचारसरणी जागृत राहिली नाही, तर आपला कसा घात होईल याचा पत्ताच लागणार नाही. म्हणून अत्यंत जपून वागणे जरूर आहे. परोपकार याचा सरळ अर्थ पर-उपकार; म्हणजे दुसऱ्यावर केलेला उपकार. यावरून असे लक्षात येईल की, परोपकाराला दोन व्यक्तींची गरज लागते. एक उपकार करणारा, आणि दुसरा उपकार करून घेणारा. जगातल्या सर्वसाधारण व्यक्ती पाहिल्या, तर आपल्या स्वतःवरून असे दिसते की, मी एक निराळा, आणि प्रत्येक व्यक्ती आणि वस्तुमात्रागणिक सर्व जग निराळे. मनाच्या या ठेवणीमुळेच, जर आपल्या हातून दुसऱ्याचे कधीकाळी एखादे काम होण्याचा योग आला, तर ‘ मी दुसऱ्याचे काम केले ’ ही जाणीव होऊन अहंकार झपाट्याने वाढू लागतो. म्हणून परोपकाराच्या बाबतीत अत्यंत सावध राहण्याची सूचना सर्व संतांनी दिली आहे. नामात राहिले म्हणजे अहंकार नाहीसा होऊन सावधानता येते आणि चित्त शांत होते. **१४८. जगात परोपकारी म्हणून नावाजलेले, पण भगवंताचे अधिष्ठान नसलेले मोठेमोठे लोकसुद्धा मानाबिनात कोठेतरी अडकल्यावाचून राहणार नाहीत.**

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

या समासात श्री समर्थांनी वेदांत दृष्ट्या आणि साधनदृष्टया एक फार मौल्यवान गोष्ट सांगितली आहे. ती अशी की आपण जे जग पहातो ते संबंध चराचर विश्वाला व्यापून टाकले आहे आणी ते दृष्य आहे आपण ते डोळ्यांनी पहातो. सचेतन म्हणजे जिवंत प्राण्यामध्ये जाणीव असते यात नवल काही नाही. परंतू अचेतन वस्तूमध्ये देखील जाणीव असते हा वेदातांचा सिध्दांत आहे.सर्व संतांचा हाच अनुभव आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, २७ फेब्रुवारी २०२४
⦿ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⦿ मराठी ⦿ दैनिक
⦿ वर्ष - ०३ ⦿ अंक - १८७
⦿ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

मराठी भाषा दिवस

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 27 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-187 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# पुन्हा राज्यभरात फिरुन रान उठवणार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : सोमवारी दिवसभर घडलेल्या महत्त्वपूर्ण घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे सुरु असलेले आमरण उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या १६ दिवसांपासून मनोज जरांगे यांचे उपोषण सुरु होते. अंबड तालुक्यातील जमावबंदीचे आदेश, मराठवाड्याच्या काही भागांमध्ये खंडित करण्यात आलेल्या इंटरनेट सेवा तसेच राजकीय नेत्यांकडून जरांगे यांच्या वक्तव्याचा सुरु झालेला निषेध या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांनी तुर्तास दोन पावले मागे घेत मराठा आंदोलनाची रणनीती नव्याने ठरवण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.**



## मनोज जरांगे : आमरण उपोषण स्थगित; अंबडमध्ये जमावबंदी

या पार्श्वभूमीवर जरांगे यांनी सोमवारी दुपारी अंतरवाली सराटी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आमरण उपोषण स्थगित करत असल्याचे जाहीर केले. आता मी डॉक्टरांचा सल्ला घेऊन पुढे काय करायचे, हे ठरवेन. पुढील एक-दोन दिवस मी उपचार घेईन. त्यानंतर लगेच पुढचा दौरा घोषित करेन. संचारबंदीमुळे मराठा बांधवांना इकडे येणे शक्य नाही. त्यामुळे लोक सैरभैर झालेत. मी सुखरुप आहे. मला कोणीही कुठेही नेलेले नाही. तोपर्यंत मराठा समाजाने शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरु ठेवावे. बीड, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात इंटरनेट बंद केले आहे. त्यामुळे अफवा पसरत आहेत, त्या पसरुन देऊ नका, असे जरांगे यांनी सांगितले. मराठा बांधवांच्या विनंतीनुसार, मी आमरण उपोषण स्थगित करत आहे. त्याचे रुपांतर साखळी उपोषणात करत आहे. मी गावागावत जाऊन मराठा बांधवांच्या भेटीगाठी घेणार आहे. लोकशाहीत प्रत्येकाला इतरांना भेटण्याचा मुलभूत अधिकार आहे. मी तुमच्याकडे येत आहे, असे जरांगे यांनी सांगितले. जरांगे यांनी रविवारी रात्री उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एकेरी भाषेत टीका केली होती. त्यांची जीभ घसरल्याने वाद निर्माण झाला होता. त्यानंतर भाजप नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांना लक्ष्य केले होते. यावेळी मनोज जरांगे यांनी फडणवीसांच्या सागर बंगल्यावर जाणार असल्याचे म्हटले होते. ते मुंबईच्या दिशेने निघालेही होते. परंतु, पोलिसांनी सहकाऱ्यांची धरपकड करत संचारबंदी लागू केल्यानंतर मनोज जरांगे यांनी मुंबईला जाण्याचा निर्णय रद्द केला होता.



**देवेंद्र फडणवीसांना दंगल घडवून आणायची होती :** मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. जे काही रविवारी सरकारने केले ते काही चांगले नाही. मी राज्य बेचिराख होण्यापासून वाचवलं आहे, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांच्यावर मनोज जरांगेंनी गंभीर आरोप केले आहेत. पोलिसांनी जर लाठीचार्ज केला असता तर त्याला प्रत्युत्तर म्हणून संपूर्ण राज्य पेटले असते. डोके ठिकाणावर ठेवून आणि विचार करुन बोला, असे मनोज जरांगेंनी म्हटले आहे.

**तर मराठा समाज पेटून उठला असता :** इथे आज सकाळी किंवा रात्रीसुद्धा लाठीचार्ज झाला असता तर सर्व मराठा समाज पेटून उठला असता. पुन्हा एकदा राज्य बेचिराख होण्यापासून मी वाचवले आहे. पहिल्या लाठीचार्जनंतर जो उद्रेक झाला त्यातल्या केसेस अजूनही मागे घेण्यात आलेल्या नाहीत. त्यांना आतापर्यंत वाटले असते की, माझी जनता आहे. तर त्यांनी केसेस मागे घेतल्या असत्या. त्यांनी पोलीस बाजूला सारावेत. सागरचा दरावाजा उघडावा मी यायला तयार आहे. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगू इच्छितो की, मराठ्यांच्या नाराजीची लाट अंगावर घेऊ नका.

**मनोज जरांगेंच्या मागण्या मारुतीच्या शेपटीप्रमाणे :** मनोज जरांगेंच्या मागण्या मारुतीच्या शेपटीसारख्या वाढत चालल्या आहेत. मुख्यमंत्र्यांना ते शिव्या देत आहेत. उपमुख्यमंत्र्यांना शिव्या देत आहेत. सगळ्या लोकांना मनोज जरांगे शिव्या देत आहेत. त्यांचं शिक्षण नाही, त्यांचा काही अभ्यास नाही तरीही ते बडबड करत आहेत. आता बघू काय होते? असे म्हणत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगेंवर टीका केली आहे. जे लोक कायदा हातात घेतील त्यांच्याविरोधात कारवाई केली पाहिजे हे पोलिसांचं काम आहे. मनोज जरांगेंचे सहकारीच त्यांच्यावर आरोप करत आहेत. त्यामुळे आता त्या सगळ्याचीही चौकशी झाली पाहिजे, म्हणजे नेमके जरांगेच्या मागे कोण आहे ते लक्षात येईल असंही छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

## कामावरून काढले म्हणून उपासमारीची परिस्तिथी : आयुक्तांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मनपा येथे सफाई कामगार पदावर कार्यरत होते गेल्या अनेक वर्षांपासून सफाई कर्मचारी यांच्या नियुक्तीबद्दल काम रखडले आहे उपासमारीची परिस्थिती असताना कामावर पुन्हा रुजू होण्यासाठी कर्मचाऱ्यांचे आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. सर्व स्वच्छता कर्मचारी ठेक्यावर काम करीत होते . त्यावेळी आस्था कंपनीचा ठेका होता. काही कारणास्तव आस्था कंपनी बंद पडली त्यावेळेस महापौर प्रतिभाताई चौधरी त्यांचा कार्यकाळ असतांना तो आस्था कंपनीचा ठेका बंद पाडण्यात आला. ठेका बंद पडल्यामुळे ठेक्यावर कंत्राटी कामगारांचे कामही बंद पडले. त्यांची रोजंदारी बंद पडली. या ठेक्याच्या कामावर 40 ते 50 स्वच्छता कर्मचारी काम करत होते व प्रामाणिकपणे काम करायचे सर्वांत महत्वाचे म्हणजे कोरोना काळात सुध्दा या



लोकांनी प्रामाणिकपणे काम केले आहे. तरी आता ठेक्याचे काम बंद पडल्याने बरेचशे सफाई कर्मचारी घरी बसले आहेत. परंतु पोटाची खळगी भरण्यासाठी फार धडपड करावी लागते. निवेदनात धुळ्याचे आमदार मा. फारुक शाह व महानगरपालिकचे आयुक्त टेकाडे साहेब यांना निवेदन देण्यात आले होते. तरी सुध्दा प्रशासनाने सफाई कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष केले. काही महिन्यांचे पगार सुध्दा अडकले आहेत. परंतु आता काम बंद पडले आहे. काम बंद पडल्यामुळे ह्या कर्मचाऱ्यांना बरेचशा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यावेळी बाईसाहेब अनिल बिऱ्हाडे, सविता दिनेश गोसावी, कविता राजेंद्र सैंदाणे, संगीता भिमराव लाठे, सीमा किरण लुटे, सुरेखा अशोक राखोंडे, जनाबाई भगवान ठाकूर, छबाबाई सुरेश लोंढे, रत्ना मधुकर दामोदर, संगीता संतोष तोटे, मनिषा प्रकाश खोंडे,कविता विजय बोरसे,मंदाबाई अनिल अहिरे, सरलाबाई अशोक शिरसाठ,संगीता रंगनाथ आव्हाड, दिपाली नितीन गवळी, मनीषा भैय्या गवळी, नंदा ईश्वर चांगरे, वैशाली, विमलबाई, संगीता केदार, सीमाबाई विनोद नगराळे, रिनाबाई शशीकांत निकम, माधुरीबाई मनोज पानपाटील, गीतांजलीबाई अमोल देवरे उपस्थित होते.

## मला नोबल पुरस्कार मिळाला पाहिजे : केजरीवाल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशाची राष्ट्रीय राजधानी आणि केंद्रशासित प्रदेश असलेल्या दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार आहे. हा प्रदेश केंद्रशासित असल्याने केंद्र सरकारचंही येथे नियंत्रण असतं. केंद्राचा सर्वाधिक हस्तक्षेप असलेल्या राजधानी सरकार चालवल्याबद्दल मला नोबेल पारितोषिक मिळायला हवा, असा उपहासात्मक टोला मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी लगावला आहे. पाणी बिलाविरोधात आम आदमी पक्षाने रविवारी निषेध नोंदवला. या निषेधादरम्यान पक्ष कार्यकर्त्यांना संबोधित करताना मुख्यमंत्री केजरीवाल म्हणाले, भाजपाने दिल्लीतील शाळा आणि रुग्णालयांचे बांधकाम रोखण्याचा प्रयत्न केला.

# झाडांमध्ये ठेवले भांडे अन् भांड्यात पाणी, धान्य

## तरडगावच्या माऊली सेवा दलाचे पक्षांना जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

सुशिल गायकवाड

लोणंद : दुष्काळ जन्य परिस्थितीत ज्या झळा माणसांना बसत असतात.तीच झळ वन्य जीवांना सुद्धा सोसावी लागत असते.अनेक गावातील लोकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असते. तसेच पाण्याच्या शोधार्थ वन्यजीव सुद्धा हिकडे तिकडे फिरत असतात. केवळ पाणी न मिळाल्याने उष्णतेच्या दाहकतेने वन्यजीव पक्षी यांचे जीव सुद्धा जात असतात.त्यामुळे वन्यजीव पक्ष्यांपर्यंत पाणी घेऊन जाणे ही जबाबदारी सुद्धा माणसांची आहे.याची जाणीव ठेवून तरडगाव ता.फलटण येथील माऊली सेवा दलाने काळजच्या टेकडीवर पक्षांना जीवदान देणाऱ्या अनोख्या उपक्रमास हाती घेतले.या उपक्रमामुळे माऊली सेवा दलाचे कौतुक तर होतच आहे. शिवाय असे उपक्रम घेणे व त्यात सहभागी होणे हे अत्यंत गरजेचे आहे. श्री.संत ज्ञानेश्वर माऊली सेवादल तरडगांव यांच्या वतीने व कमिन्स इंडीया लि.चे जनसंपर्क आधिकारी प्रविण गायकवाड यांच्या सहकार्याने काही दिवसांपूर्वी काळजच्या येथील टेकडीवर वृक्षरोपण मोहीम हाती घेण्यात आली होती.त्यावेळी झाडे लावण्यात आली.त्याच झाडांना पाणी देण्यासाठी रविवार दि.२५/२/२४ रोजी स ६ ते १० या वेळेत माऊली सेवा दलाच्या वतीने मोहीम राबविण्यात आली. यावेळी झाडांना पाणी तर दिलेच शिवाय पक्षांना धान्य व पिण्याच्या पाणी मिळावे म्हणून झाडात पाण्याची व धान्याची भांडी बसविण्यात आलेली आहेत. तसेच भांड्यात पाणी आणि धान्य ठेवण्यात आले.या परिसरात भटकंती करणाऱ्या पक्ष्यांना हे अन्न पाणी उपलब्ध करून देता आल्याने माऊली सेवा दलाने समाधान व्यक्त केलेले आहे.हे कार्य पार पाडत असताना यावेळी श्री.संत ज्ञानेश्वर माऊली सेवादलाचे अध्यक्ष सतिश गायकवाड,सचिन बावकर, दिलीप धुमाळ,मुरलीधर गायकवाड,सुधीर मदने,पी आर गायकवाड,किशोर गायकवाड आदींनी विशेष मेहनत घेतली.



# युवाशक्तीचा विजय

आधुनिक केसरी

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथा सामना सोमवारी रांचीत पार पडला. या सामन्यात भारताने इंग्लंडचा ५ विकेट्सनी पराभव करत मालिकेत ३-१ ने अजेय आघाडी घेतली आहे. भारतीय संघाच्या या विजयात शुबमन गिल आणि ध्रुव जुरेलने नाबाद ७२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करून मोलाचे योगदान दिले. त्याचबरोबर रविचंद्रन अश्विननेही खारीचा वाटा उचलला. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना इंग्लंड संघाने ३५३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव तिसऱ्या दिवशी ३०७ धावांवर गारद झाला. अशा प्रकारे इंग्लंडकडे पहिल्या डावाच्या आधारे ४६ धावांची आघाडी होती. यानंतर इंग्लंडने दुसऱ्या डावात १४५ धावा केल्या आणि भारतासमोर विजयासाठी १९२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. जे भारतीय संघाने ६१ षटकांत ५ गडी गमावून पार केले. जुरेलच्या बॅटमधून विजयी धावा आल्या. त्याने दोन धावा घेत सामना जिंकवला. जुरेल ३९ धावांवर नाबाद राहिला आणि शुबमन ५२ धावांवर नाबाद राहिला. याशिवाय कर्णधार रोहित शर्माने ५५ धावांची खेळी केली. त्याचबरोबर इंग्लंडकडून शोएब बशीरने पुन्हा एकदा कमाल करत तीन विकेट्स घेतल्या. आज चौथ्या दिवशी भारताने एकही विकेट न गमावता ४० धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात केली होती. भारताला ८४ धावांवर पहिला धक्का बसला, जेव्हा जो रूटने यशस्वी जैस्वालला जेम्स अँडरसनकरवी झेलबाद केले. त्याला ३७ धावा करता आल्या. त्यानंतर रोहित शर्माही कसोटी कारकिर्दीतील १७ वे अर्धशतक झळकावून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याला टॉम हार्टलीने बेन फॉक्सच्या हाती झेलबाद केले. रोहितला ५५ धावा करता आल्या. रजत पाटीदार पुन्हा अपयशी ठरला आणि खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला. रवींद्र जडेजाही विशेष काही करू शकला नाही आणि चार धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. हार्टलेने सलग दोन चेंडूंवर जडेजा आणि सर्फराझ खानला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. सर्फराज खाते उघडू शकला नाही आणि झेलबाद झाला. यानंतर जुरेल आणि शुबमनने शानदार फलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला. दोघांनी स्ट्राईक रोटेट करत भारताला विजयाकडे नेले. शुभमनने कसोटी कारकिर्दीतील सहावे अर्धशतक झळकावले. त्याचवेळी पहिल्या डावात ९० धावा केल्यानंतर ध्रुवने त्याच आत्मविश्वासाने दुसऱ्या डावाला सुरुवात करत अनेक उत्कृष्ट फटके मारले.

# मराठा आरक्षण श्रेयवादात अडखळले!

आधुनिक केसरी




श्रीपाद सबणीस
संपर्क क्र. 9960542605

**आमच्या मराठवाड्यात एक म्हण प्रचलित आहे, 'बोलाचाच भात, अन् बोलाचीच कढी'. आज मला या म्हणीची मराठा आरक्षण आंदोलन आणि त्याची जी परिणिती झाली ती अवस्था पाहून प्रकर्षाने आठवण झाली. अर्थातच हा भात आणि त्यावरची कढी ओरपून जी ढेकर काहींनी दिली होती ती देखील बोलाचीच ठरली. तर, असा हा सारा मामला 'बातों बातों में...' असाच म्हटला तर वावगे ठरू नये. अर्थातच या आंदोलनाच्या निमित्ताने काही चांगले प्रयोग महायुती सरकारने केले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी देखील काही चांगले पायंडे पाडले त्या बाबी नक्कीच प्रशंसनीय ठराव्यात.**

मात्र मुद्दा असा ही आहे की, १९७८ पासून शरद पवार (१९७८), बाबासाहेब भोसले(१९८२), वसंतदादा पाटील (१९८३), शिवाजीराव पाटील निलंगेकर (१९८५), शंकरराव चव्हाण (१९८६), शरद पवार (१९८८ आणि १९९३ ), नारायण राणे (१९९९), विलासराव देशमुख (१९९९ आणि २००४), अशोक चव्हाण (२००८ ते २०१०), एवढे मराठा समाजाचे मुख्यमंत्री होऊन गेले. ऑगस्ट २०१८ पर्यंत आरक्षण हा राज्यांच्या अखत्यारितला प्रश्न होता. ऑगस्ट २०१८ मधील घटना दुरुस्ती नंतर हे अधिकार केंद्र सरकारकडे गेले. ९ मराठा मुख्यमंत्र्यांनी सहज शक्य असताना हे का केले नाही? महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनात आता मराठा आरक्षण विधेयक एकमुखाने मंजूर झाल्यानंतर जे फटाके फुटले, जी आतषबाजी झाली ते सारे हे अशा बोलाच्याच यशाचे होते. सत्ताधारी मग तो पक्ष कोणताही असो. त्यास स्वतःची पाठ स्वतःच थोपटून घ्यायला फार आवडत असते, हे या मराठा आरक्षणाच्या निमित्ताने पुन्हा एकदा पहायला मिळाले. एखादा अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न खरोखरच सुटल्याचे दिवास्वप्न सत्ताधारी मंडळी अतिशय खुबीने रंगवतात. तमाम जनतेला कल्पकतेने त्यात गुंगवून टाकतात. वाशीमध्ये गुलालाची उधळण सुरू झाल्यानंतर काही क्षण सारे जण अशाच स्वप्नरंजनात मुशगुल झाले, हे सबंध महाराष्ट्राने पाहिले. महायुतीचे सरकार मराठा आरक्षणाच्या मुद्यावर काही विशेष आणि वेगळी भूमिका मांडत आहे असे दिसत नाही. मराठा समाजास स्वतंत्रपणे, म्हणजे अन्य मागास जाती (ओबीसी) वर्गाच्या बाहेर, १० टक्के आरक्षण देण्याचा आपला निर्णय हा मराठा आरक्षणाची समस्या सोडवणारा आहे, अशी सरकारची भूमिका आहे आणि समस्त राज्याने ही भूमिका मान्य करावी अशी महायुती सरकारची धारणा आहे. आता या बोलाचा भात, कढी आणि ढेकर यावर गरीब मराठा वर्ग विश्वास ठेवणार का? या मुलभूत प्रश्नाचा विसर कार्यतत्पर राज्यकर्त्यांना कसा पडला हे अनाकलनीय आणि त्याहून अधिक अतर्क्य असेच म्हणावे. अर्थातच असा निर्णय पहिल्यांदाच घेतला गेला आहे, असे नक्कीच नाही. प्रत्येक वेळी या विषयीचा निर्णय घेताना ही समस्या पूर्णपणे सोडविल्याचा आनंद साजरा करण्यात आला होता. त्या आनंदाचे पुढे काय झाले?, हे सबंध महाराष्ट्राला ज्ञात आहेच. त्यामुळे सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपण हे आव्हान खरोखरच पेलले असे वाटत असले तरी त्यांच्याही आनंदाचे यापेक्षा काही वेगळे होईल, अशी शक्यता दिसत नाही. ते का, याचा विचार व्हायला हवा; मात्र नेमकेपणाने या विषयाकडे फारसे कोणी लक्ष देत नाही. म्हणूनच मराठा आरक्षणाचे घोंगडे भिजत पडले आहे. माथाडी कामगार नेते स्व.श्री.अण्णासाहेब पाटील यांनी १९८० मधे सर्वप्रथम मराठा आरक्षणाची मागणी केली होती. अंदाजे ४४ वर्ष झाली हा लढा सुरूच आहे. अर्थातच यासाठी दोन बाबी प्रामुख्याने कारणीभूत ठरतात, त्यापैकी एक म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासाठी घालून दिलेली मर्यादा आणि दुसरी बाब म्हणजे ती ओलांडण्यासाठी राज्य सरकारने दाखवलेली चतुर घाई. या आधी २०१९ साली मराठा समाजास आरक्षण नाकारताना सर्वोच्च न्यायालयाने यामुळे राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक होईल याकडे निर्देश केला होता. तत्कालीन सरकारने घेतलेल्या अशाच आरक्षण निर्णयाविरोधात २०१९ च्या जूनमध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर झाली. तो प्रयत्न अयशस्वी ठरला. कारण, एकंदर आरक्षण-मर्यादा ५० टक्क्यांहून जास्त नसावी याबाबत तसेच बिगर-अनुसूचित पण मागास जातींच्या आरक्षणांबद्दल पथदर्शी ठरणा-या इंद्रा साहनी निकालाचा फेरविचार करावा लागेल. त्यासाठी अधिक मोठे घटनापीठ स्थापन करावे लागेल. कारण 'मंडल' या नावाने ओळखल्या जाणा-या इंद्रा साहनी खटल्याचा निकाल ९ जणांच्या पीठाने दिला. त्याचा फेरविचार करायचा म्हणजे आता या प्रकरणी ११ न्यायाधीशांचे घटनापीठ गठीत करावे लागेल. तसे काही आता झालेले नाही, होण्याची शक्यताही नाही. गेल्या वेळच्या तुलनेत महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठी यावेळी जास्त प्रयत्न केले हे खरे. त्यावेळी इंद्रा साहनी निकालाने तेव्हा घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा आता फेरविचारास पात्र ठरते, असा दावा महाराष्ट्र सरकारच्या वतीने न्यायालयात करण्यात आला. त्यास आधार म्हणजे साहनी खटल्याच्याच निकालपत्रातील एक वाक्य... ''या निकालाचा फेरविचार काळाच्या ओघात होऊ शकतो'', हे वाक्य यापूर्वीही अनेक जातींच्या आरक्षण-मागण्यांसंदर्भात उद्धृत झालेले आहे. पण तसे करायचे तर एकटे महाराष्ट्र सरकार त्यास अपवाद ठरू शकत नाही. कारण अशी काही महत्त्वाची घटनादुरुस्ती एका समाजासाठी एका राज्यापुरती होऊ शकत नाही. म्हणजेच त्यासाठी बहुराज्यीय प्रयत्न व्हायला हवेत आणि त्यासाठी केंद्र सरकारलाच पुढाकार घ्यावा लागेल; अन्य राज्यांतूनही त्यास समर्थन तितकेच गरजेचे ठरते. ही गोष्ट तितकीशी सहज साध्य नाही म्हणूनच महाराष्ट्र सरकारला किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार अथवा दस्तुरखुद्द मनोज जरांगे यांना वाटले म्हणून हे आरक्षण प्रत्यक्षात येणार नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, राजकीय हेतूने प्रेरित आरक्षणाचा मुद्दा देशात कोठेही सुटलेला नाही. महाराष्ट्रात मराठा समाज, गुजरातेत पाटीदार, हरियाणात जाट, आंध्र प्रदेशात कुप्पु आणि राजस्थानात गुज्जर अशा अनेक राज्यांतील अनेकांना आरक्षण हवे आहे. यातील काहींचा प्रश्न १०३ व्या घटनादुरुस्तीद्वारे केंद्र सरकारने सोडवला आणि त्यांना आर्थिक मागास या नव्या प्रवर्गांतर्गत आरक्षण मिळेल अशी व्यवस्था केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या निवडणुकांच्या तोंडावर यासाठी पुढाकार घेतला होता. त्याचे राजकीय फळ त्यांना मिळाले. एकीकडे या आरक्षणाचा लाभ त्या राज्यातील लोक घेत आहेत, मात्र केवळ महाराष्ट्रातील मराठ्यांना आर्थिक मागास प्रवर्गातून आरक्षण नको आहे, ते का? हे अनाकलनीय आहे. तसे ते देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री शिंदे यांनी केला. पण हा प्रयत्न यशस्वी झाला तर त्याचे श्रेय भाजपास नव्हे, तर शिंदे यांच्या शिवसेनेस मिळेल. भाजप हे कसे होऊ देईल, हा यातील साधा राजकीय प्रश्न. म्हणजे मराठा समाजाला, या समाजातील मतदारांना भाजपकडे वळविण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी केलेला मोठा महत्त्वाकांक्षी प्रयत्न अयशस्वी ठरला. सद्यःस्थितीत भाजप आणि फडणवीस हे महायुती सरकारात एकत्र आहेत. अर्थातच दोघेही चालकाच्या भूमिकेत नाहीत. उलट व्यक्तिशः देवेंद्र फडणवीस आणि त्यांचा पक्ष आरक्षणासाठी आंदोलन करणा-यांच्या शिव्याशापांचे धनी होताना दिसतात. ते योग्य की अयोग्य हा मुद्दा वेगळा. पण दिसते ते चित्र असे आहे. अशा परिस्थितीत मराठा समाजास आरक्षण मिळवून देण्याचे पूर्ण श्रेय भाजपास मिळणार नसेल, तर हे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी त्या पक्षाचे नेतृत्व का प्रयत्न करेल? ही बाब मराठा समाजातील आरक्षण आंदोलक आणि त्यांचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे तरी समजून घेतील का? हा खरा प्रश्न आहे. या सा-या प्रकरणातील आणखी एक मेख म्हणजे 'ओबीसी' समाजावर भाजपचे असलेले राजकीय प्रभुत्व. उच्चवर्णीय आणि ओबीसी हा भाजपचा मुख्य आधार आहे. त्यामुळे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणा-यांची इच्छा आहे, त्याप्रमाणे ओबीसी समाजाच्या आरक्षणात मराठ्यांनाही सामावून घेण्याचा, आहे त्यातील वाटा त्यांनाही देण्याचा निर्णय भाजप कदापिही घेणार नाही. ओबीसी आरक्षणास धक्का न लावता मराठ्यांस स्वतंत्रपणे आरक्षण देणे शक्य असेल तर तो निर्णय नंतरच्या श्रेयाकडे लक्ष ठेवून भाजपच नाही का घेणार? गेल्या वर्षभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी किमान डझनभर वेळेस महाराष्ट्रात येऊन गेले. एकदाही त्यांनी कधी या मराठा आरक्षणातील 'म'देखील उच्चारलेला नाही. यावरून भाजपास या आरक्षण प्रकरणात किती स्वारस्य आहे ते दिसून येते. अशावेळी ओबीसी आरक्षणाबाहेर मराठ्यांना आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय भाजप अन्य कोणास घेऊ देईल? वर्षानुवर्ष ज्यांनी सत्तेचा उपभोग घेतला त्या जाणत्या नेत्यांनी, आणि राजकीय भीष्माचार्यांनी मराठा समाजाला आजवर सतत झुलवत ठेवले. गेली पन्नास-एक वर्ष मराठा आरक्षणाचा 'म' बोलण्याची कोणाची बिशाद नव्हती. नेमके आत्ताच निवडणुकीच्या तोंडावर कसे काय हे वादळ उठले? हे देखील लक्षात घेतले पाहिजे. मुळात महाराष्ट्रातील राजकीय अस्वस्थता आणि अस्थिरतेमुळे आगामी निवडणुकीतील मतदानावर डोळा ठेवून महाराष्ट्राच्या राजकीय सारीपाटावर ज्या काही सोंगट्या मांडल्या आहेत त्यापैकी मराठा आरक्षण ही एक सोंगटी म्हणता येईल. प्रत्येक पक्ष, नेते आपापल्या पद्धतीने आणि वकुबाप्रमाणे डाव खेळून पाहात आहेत. तात्पर्य, मराठा आरक्षणाची गाडी श्रेयवादात रूतली आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. विद्यमान महायुती सरकारने कितीही ढोल-तुता-या वाजवल्या, सरकार समर्थकांनी भुईनळ्यांची कितीही आतषबाजी केली तरी या वास्तवाकडे दुर्लक्ष करता येत नाही. सरकारातील धुरीणांसही हे माहीत नसेल, असे नाही. पण जेथे सगळ्यांनाच गाजराच्या पुंग्या वाजवण्याचा आनंद लुटायचा असतो, तेथे यापेक्षा वेगळे काय होणार? काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पहिल्यांदा असाच खेळ केला. त्याहीवेळेस हा प्रयोग फसणार हे त्यांस माहीत होते. पण तरीही हा प्रयोग लावला गेला कारण २०१४ च्या निवडणुका. नंतर २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर तेव्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हा प्रयोग केला. आताही आगामी निवडणुकांच्या तोंडावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तोच सारीपाट पुन्हा मांडला. त्यामागे त्यांची अपरिहार्यता असली तरी या खेळाचा निकाल बदलेल असे नाही. जोपर्यंत केंद्र वा सर्वोच्च न्यायालयात याचा सोक्षमोक्ष लागत नाही, तोपर्यंत या सारीपाटावरील सोंगट्यांचा डाव अव्याहतपणे सुरू राहील, हे निश्चित!

# पाकिस्तानात राजकीय अस्थिरता

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

**पाकिस्तानात सार्वत्रिक निवडणुका होऊन १५ दिवस उलटले तरी तिथे अद्याप सरकार स्थापन होऊ शकले नाही. सरकार स्थापन करण्यासाठी नवाज शरीफ यांच्या मुस्लिम लीग आणि बिलावल भुट्टो यांच्या पाकिस्तान पीपल्स पार्टी मध्ये बैठकीच्या पाच फेऱ्या होऊनही समाधानकारक तोडगा निघू शकला नाही त्यामुळे पाकिस्तानात कमालीची अस्थिरता पसरली आहे. पाकिस्तानमध्ये इम्रान खान यांचा पाकिस्तान तेहरिक ए इन्साफ हा पक्ष सत्तेवर होता आणि इम्रान खान त्या सरकारचे प्रमुख म्हणजेच देशाचे पंत्रधानपद होते मात्र पंतप्रधान असताना इम्रान खान यांनी पाकिस्तानी लष्कराच्या मर्जीवर सरकार चालविण्यास नकार दिल्याने लष्कराने कट कारस्थान करून त्यांचे सरकार पाडले आणि आपल्या मर्जीतील शहाबाज शरीफ यांना पंतप्रधान केले मात्र शहाबाज शरीफ यांची कारकीर्द निराशाजनक राहिली त्यांच्या कारकिर्दीत पाकिस्तानात महागाई ने कळस गाठला.**

जनता रस्त्यावर उतरली. कर्जाचा डोंगर वाढत गेला. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेली. या दरम्यान शहाबाज शरीफ यांनी इम्रान खान यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तुरुंगात डांबले. निवडणूक आयोगाने इम्रान खान यांच्या पक्षाची मान्यता रद्द केली. त्यांना दिलेले बॅट हे चिन्ह काढून घेतले. त्यांना निवडणूक लढवण्यास बंदी घातली त्यामुळे पाकिस्तानी जनतेत शहाबाज शरीफ यांच्या विरोधात प्रचंड रोष निर्माण झाला. हा रोष आपल्याला परवडणार नाही हे हेरून पाकिस्तानी लष्कराने शहाबाज शरीफ यांचे मोठे बंधू नवाज शरीफ यांना लंडन वरून पाचारण केले आणि त्यांना पंतप्रधान करण्याचा चंग बांधला. निवडणुका घोषित झाल्या. निवडणुका झाल्यावर नवाज शरीफ यांना पंतप्रधान करून आपल्या हातचे बाहुले बनवायचे आणि त्यांच्या मार्फत आपल्याला हवा तसा कारभार करायचा असा पाकिस्तानी लष्कराचा डाव होता मात्र इम्रान खान यांना ज्याप्रकारे तुरुंगात डांबण्यात आले, त्यांच्या पक्षाची मान्यता रद्द करण्यात आली, त्यांना निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली हा सर्व प्रकार पाकिस्तानी जनतेला रुचला नाही. पाकिस्तानमध्ये इम्रान खान यांच्या बद्दल प्रचंड सहानुभूती निर्माण झाली. हीच सहानुभूती हेरून इम्रान खान यांनी आपल्या समर्थकांना अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे केले. पक्षाची मान्यता काढून घेण्यात आली, पक्ष चिन्ह गोठवण्यात आले, पक्ष प्रमुखास निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली, त्याला तुरुंगात डांबण्यात आले तरीही इम्रान खान यांच्या समर्थकांनी निवडणुकीत घवघवीत यश मिळवले. अपक्ष म्हणून मैदानात उतरलेल्या इम्रान खान यांच्या समर्थकांनी निवडणुकीत सर्वाधिक जागा पटकवल्या. इम्रान खान यांच्या समर्थकांनी २६५ पैकी ९३ जागा पटकवल्या तर नवाज शरीफ यांच्या मुस्लिम लीगला ७५, बिलावल भुट्टो यांच्या पाकिस्तान पीपल्स पार्टीला ५४ जागा मिळाल्या. मुत्ताहिदा कौमी मुव्हमेंट या पक्षाला १७ जागा मिळाल्या. कोणालाच बहुमत न मिळाल्याने त्रिशंकू अवस्था निर्माण झाली त्यामुळे सरकार स्थापन करण्यासाठी कोणत्या तरी दोन पक्षांची आघाडी होणे आवश्यक होते. इम्रान खान यांच्या समर्थकांनी आपण कोणासही पाठिंबा देणार नाही असे जाहीर केल्याने नवाज शरीफ आणि बिलावल भुट्टो यांना एकत्र येण्याशिवय पर्याय राहिला नाही. सरकार स्थापन करण्यासाठी दोघांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यात सरकार स्थापनेसाठी पाच बैठका झाल्या. नवाज शरीफ यांच्या पक्षाला अधिक जागा असल्याने पहिले तीन वर्ष नवाज शरीफ पंतप्रधान राहतील व उरलेले दोन वर्ष बिलावल भुट्टो पंतप्रधान होतील असे ठरले मात्र ऐनवेळी बिलावल भुट्टो यांनी माघार घेतली. जनतेच्या मनात असेल तेंव्हाच आपण पंतप्रधान होऊ असे त्याहूनजाहीर केले. एका अर्थी त्यांनी नवाज शरीफ यांच्याशी आघाडी करण्यास नकार दिला त्यामुळे पाकिस्तानातील पेच आणखी वाढला. आता सत्ता स्थापन करण्यासाठी नवाज शरीफ यांना इम्रान खान यांच्या समर्थकांना फोडावे लागेल अर्थात ही गोष्ट वाटती तितकी सोपी नाही त्यामुळे आगामी काही काळ पाकिस्तानात अस्थिरताच राहील आणि दररोज नवे राजकीय नाट्य पाहायला मिळेल. या राजकीय पेचात खरी गोची झाली ती पाकिस्तानच्या लष्कराची.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ओबीसींच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कटिबद्ध

## ओबीसी आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी ओबीसी नेते भुजबळांच्या भेटीस !

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी समाजासाठी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे राज्य सरकारने राज्यातील मराठा समाजाला स्वतंत्र शिक्षण आणि नोकरीमध्ये 10% आरक्षण देनारे विधेयक 20 फेब्रुवारीला विधी मंडळच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर करन्यात आले. ओबीसी समाजाच्या आरक्षणला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण दिले. सरकारच्या या निर्णयमुळे ओबीसी समाजाच्या शैक्षणिक, राजकिय आरक्षणला कोठेही धक्का लागला नाही. त्याबद्दल सकल ओबीसी भटके विमुक्त समाज पारनेरच्या वतीने ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली. तसेच त्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि आभार व्यक्त करण्यात आले. मंत्री भुजबळ यांनी या भेटीमध्ये पारनेर मधिल ओबीसी भटके विमुक्त आणि दलित



समाजाच्या विविध प्रश्नबाबत माहीती जानुन घेतली. तसेच सामाजिक, राजकिय प्रतिनिधित्व आणि परिस्थीती विषयी महिती घेतली. पारनेर तालुक्यातील ओबीसी बहुजन समाजाच्या पाठीशी खंबीर उभे राहनार असल्याची ग्वाही दिली. पुढील काळमध्येही हक्क आणि अधिकारासाठी असेच ओबीसी बहुजन समाजाणे जागृत राहण्याचे अवाहन मंत्री भुजबळ यांनी केले. लवकरच पारनेर आणि नगरच्या दौऱ्यावर येनार असल्याची महितीही यावेळी दिली. यावेळी जेष्ट ओबीसी नेते श्री खंडूजी भुकन, किसन रासकर, राजेंद्र शिंदे, प्रसाद खामकर, श्रीमती सुवर्णा धाडगे, नाथा रासकर, दत्तात्रय नगरे, संदिप शिंदे, बाळासाहेब नवले, मच्छिंद्र नगरे, अशोक खोडे उपस्थीत होते.

# कन्नड ग्रामीण रुग्णालय मोफत तपासणी व सर्जरी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुका दुर्गम व डोंगराळ असल्याने विशेष मोहिमेअंतर्गत ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे दि. 27/02/2024 ते दि. 29/02/2024 पर्यंत ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे मोफत सर्जरी (शल्य) शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ह्या शिबिरात मोफत शस्त्रक्रिया उदा. हर्निया,हायड्रोसिल , गर्भपिशवी शस्त्रक्रिया, गाठ काढणे, दातांच्या शस्त्रक्रिया तसेच हाडांच्या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

मंगळवार रोजी रुग्णांची तपासणी सकाळी 8:30 वाजेपासून दुपारी 2:00 पर्यंत होईल. दि. 28/02/2024 ( बुधवार )व दि 29/02/2024 ( गुरुवार ) रोजी शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

हे शिबीर मा. उपसंचालक डॉ. भुषणकुमार रामटेके, मा. सहाय्यक उपसंचालक डॉ. प्रदिप कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतिपवळे, आर. एम. ओ. श्री. डॉ. प्रशांत बडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व जनतेने हया शिबीराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व शस्त्रक्रिया करून घ्याव्यात असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रविण पवार यांनी केले आहे.

# रंगभूमीची सेवा करण्याची सदानंद बोरकरांना शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठ आयोजित पहिले युवा साहित्य संमेलन नुकतेच सुमानंद सभागृहात पार पडले. दोन दिवसीय संमेलनात अभिरुप न्यायालयाचे सत्र चांगलेच रंगले. रसिकांनीही उत्स्फूर्त दाद दिली. अभिरुप न्यायालयात आरोपी म्हणून प्रख्यात नाट्यकलावंत, लेखक, दिग्दर्शक, चित्रकार प्राचार्य सदानंद बोरकर होते. वकिल म्हणून युवा कवी, मुक्तपत्रकार अविनाश पोईनकर यांनी आरोपपत्र सादर केले. न्यायमुर्ती म्हणून पत्रकार मिलींद उमरे यांनी भूमीका बजावली. अभिरुप न्यायालयात वकिल अविनाश पोईनकर यांनी आरोपी सदानंद बोरकर यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले. झाडीपट्टी रंगभूमी, लोककलेच्या संवर्धनासाठी शाश्वत संस्था उभारणीसाठी पुढाकार घेतला नाही, आदिवासींच्या प्रश्नांवर अजून नाटक लिहीले नाही, सदानंद बोरकरांना पद्मश्री, विधानपरिषदेचे वेध लागले आहेत का? चित्रकलेची स्वतंत्र शैली गवसलेली असतांनाही ती वाढवलेली नाही, अशा अनेक आरोपांना सदानंद बोरकर यांनी मिस्किलपणे उत्तरे दिली. परिणामी कला, साहित्य, रसिकांसाठीच हा जन्म असल्याची कृतज्ञता व्यक्त केली. झाडीपट्टी रंगभूमी संवर्धनासाठी पाठपुरावा सुरू आहे. सध्याच्या दोन घराचं गाव नाटकातील पात्रांना आदिवासींच नावे दिल्याचे सांगितले. पद्मश्री आणि विधानपरिषदेच्या आरोपांवर ते म्हणाले, कलावंतांचा शासनाने सन्मान करायला हरकत नसल्याचे त्यांनी नमूद केले. जवळपास तासभर अभिरुप न्यायालयात सदानंद बोरकर यांच्यावर झालेले आरोप आणि त्यांनी दिलेले दिलखूलास उत्तरे यामुळे अभिरुप न्यायालय चांगलेच रंगले.

**न्यायाधिशांनी बोरकरांना ठोठावली शिक्षा :** अभिरुप न्यायालयात आरोपी सदानंद बोरकर यांच्यावर आरोपपत्र सादर झाल्यानंतर न्यायमुर्ती पत्रकार मिलींद उमरे यांनी रंगभूमी व रसिकांची आयुष्यभर सेवा करण्याची शिक्षा ठोठावली. शिवाय औषधे कडू असली तरी चालेल कारण तब्बेतीची काळजी घेणं बंधनकारक असल्याची सूचनाही दिली. 'ट्रुथ फेल' असणारे सदानंद बोरकर यांनी घेतलेली सांस्कृतिक झेप आजच्या युवक व पालकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत देखील न्यायमुर्तींनी व्यक्त केली.

# चंद्रपूरकर रमले आठवणीच्या गावात, पारंपरिक खेळाला उस्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आ. जोरगेवार यांच्या संकल्पनेतून आयोजित चला आठवणीच्या गावात या महिलांकरिता खेळांच्या क्रीडा उत्सवाला चंद्रपूरकरांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला असून यावेळी खेळल्या गेलेल्या 17 खेळांमध्ये जवळपास 5 हजार महिलांनी सहभाग घेतला. यावेळी विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे वितरित करण्यात आले. आ. जोरगेवार यांच्या हस्ते सदर क्रिडा उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कल्याणी जोरगेवार, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, तपस्या सराफ, सायली येरणे, माजी नगर सेविका सुनिता लोढीया, माता महाकाली सेवा समीतीचे सचिव अजय जयस्वाल, उज्वला नलगे, शाहिस्ता खान पठाण, डॉ. जेबा निसार, सोनम खोब्रागडे, डॉ. नियाज खान, डॉ. अंजुम कुरेशी, सुचिता अगासे, वैशाली बदनोरे, सुरक्षा श्रिरामे, परविण पठाण आदींची प्रामूख्यतेने उपस्थिती होती. महिलांसाठी आ. जोरगेवार यांच्या वतीने चला आठवणीच्या गावात या पारंपारिक खेळांच्या क्रीडा उत्सावाचे आयोजन करण्यात आले होते. यंदा या आयोजनाचे दुसरे वर्ष होते. आमदार किशोर जोरगेवार यांनी उद्घाटन केल्या नंतर मौलाना अबुल कलाम आझाद बगीचा येथे दुपारी 4 वाजता सदर क्रीडा स्पर्धेला सुरवात झाली. यावेळी संगीत खुर्ची, फुगडी, मामाच पत्र हारवल, लिंबु चमचा, दोरीवरच्या उडी, लगोरी, तळ्यात - मळ्यात, बेडूक उडी, पोता उडी, दोन पायांची उडी, स्मरणशक्ती स्पर्धा, बटाटा शर्यत, रस्सीखेच, रांगोळी स्पर्धा, घागर



**बहिणींच्या चेहऱ्यावरचे आनंद हेच आमचे समाधान :** परिवार सांभळात असतांना महिलांचे स्वताकडे पुर्णताह दुर्लक्ष होते. त्यांना स्वतासाठी वेळ काढता येत नाही, स्वतासाठी जगता येत नाही. त्यामुळे एक दिवस महिलांनी स्वत:साठी जगावं. आपल्या बालपणीचे दिवस आठवून मनसोक्त आनंद लुटावा यासाठी चला आठवणीच्या गावात ही संकल्पना आपण सुरु केली. आज येथे आलेल्या प्रत्येक बहिणीच्या चेह-यांवर चिंता नाही तर आनंद दिसतोय, कोणी जिंकलय यासाठी आनंदी आहे. तर कोणी पून्हा एकदा ते खेळ खेळता आले म्हणून आनंदी आहे. तुमचा हा आनंदच आमचे समाधान असुन या आयोजनाचे यश असल्याचे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

स्पर्धा, पुजा थाळी सजावट स्पर्धा, पारंपारिक वेशभूषा स्पर्धा आदी स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धा 18 ते 30, 31 ते 45, 46 ते 60 आणी 60 वर्षांवरील अशा चार गटात पार पडल्या तर येणा-या प्रेक्षकांसाठी येथे टायर चालवणे, फुगा बंदुक, रिंग फेकणे हे खेळ आयोजित करण्यात आले होते. यावेळी वासवी क्विन महिला मंडळ, लक्ष्मी गृप कुणबी समाज, सहजयोग ज्ञान साधना केंद्र महिला शक्ती, महाकाली नारी शक्ती महिला मंडळ, आदिवासी हलबा जमात महिला मंडळ, ज्युपिटर बहु. संस्था, सर्वांगीण विकास बहु. शिक्षण प्रसारक मंडळ, लिंगायत समाज महिला मंडळ, घे भरारी महिला मंच, चंद्रपूर जिल्हा भोई समाज सेवा संघ, अल्पसंख्यांक महिला गृप, श्री स्वामी समर्थ महिला मंडळ, संस्कार परिवार माहेश्वरी महिला गृप, आदींनी सहकार्य केले.

# मुकेश चव्हाणला बँकेने ऑफर केले 11.25 लाखांचे पॅकेज

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सध्या महाविद्यालयात प्लेसमेंटचा हंगाम सुरू आहे. पुण्यातील नामांकित MBA महाविद्यालया पैकी RIIM- AIBM येथे MBA च शिक्षण घेणाऱ्या तरुणाने महाविद्यालयातून उज्जीवन बँकेतत प्लेसमेंट मिळवली आहे.



बँकेने मुकेशला 11.25 लाखांचे पॅकेज ऑफर केला आहे. मुळ जळगाव जिल्ह्यातील लासुरा तांडा (जामनेर) या गावातला रहिवासी मुकेश पुणे येथील RIIM - AIBM या नामांकित महाविद्यालयात व्यवस्थापनात पदवीत्तर MBA शिक्षण पूर्ण करण्यासाठी आले होते. मुकेश यांनी आपल्या जीवनातील सर्व क्षेत्रांत मेहनत, उत्साह आणि अद्याप सकाळची जिद्दीत सामावली. त्यांच्या प्रयत्नांच्या प्रमाणात उज्जीवन बँकेत त्यांना नोकरी मिळाली आहे. मुकेश यांच्या यशाच्या प्रतिक्रिये नंतर, RIIM-AIBM कॉलेजमध्ये प्लेसमेंट्सची नियमित व्यवस्था, व्यावसायिक शिक्षण व तत्परतेची चर्चा बढत्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श असेल असे सांगितलं आहे.

# धुळे रेल्वे स्थानकाच्या आधुनिकीकरण कामाचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रिमोटने केला शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** केंद्र सरकारच्या अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत धुळ्यासह देशभरातील ५५४ रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास, सुशोभीकरणासह देशभरातील १५०० रोड ओव्हर ब्रिज आणि अंडरपासच्या कामांचे औपचारिक शिलान्यास आणि लोकार्पण सोमवार दि. 26 फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन झाले. दरम्यान, लोकसभेच्या धुळे मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या पाठपुराव्याने धुळे रेल्वे स्थानकाच्या आधुनिकीकरणासाठी तब्बल ९ कोटी ५० लाखांचा निधी उपलब्ध झाला असून, रेल्वे स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम प्रगतिपथावर आहे. त्यानिमित्त दि. 26 फेब्रुवारीला सकाळी अकरा वा. धुळे रेल्वे स्थानक परिसरात झालेल्या कार्यक्रमास खासदार डॉ. सुभाष भामरे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, धुळे-नंदुरबार जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर प्रतिभा चौधरी, माजी महापौर प्रदीप कर्पे, भाजपचे ज्येष्ठ पदाधिकारी ॲड. एम. एस. पाटील, हिरामण गवळी, विजय पाच्छापूरकर, यशवंत येवलेकर, नगरसेवक शीतल नवले, बंटी खोपडे, ओम खंडेलवाल, आकाश परदेशी, योगिता बागूल, किशोर सिंगवी, ॲड. किशोर जाधव, नरेश चौधरी, किरण देशमुख, चेतन मंडोरे, दगडू बागूल, अमोल मासुळे, संजय बोरसे यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व विविध शाळांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी व रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी गेल्या १० वर्षांतील रेल्वेच्या प्रगतीचा आढावा घेत भविष्यातील विविध परियोजनांची माहिती दिली.या कार्यक्रमात खासदार डॉ. भामरे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी व रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या सहकार्यामुळे व आपल्या सततच्या पाठपुराव्यामुळे देशभरातील अमृत भारत स्टेशन विकास योजनेत धुळे स्थानकाचा समावेश करून घेण्यात यश मिळाले. यात धुळे रेल्वे



स्थानकाचे आधुनिकीकरण होत असून, प्रवाशांना या स्थानकात अनेक सोयी-सुविधा उपलब्ध होणार आहेत. या आधुनिकीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. यासाठी आपण ९ कोटी ५० लाखांचा निधी मिळविला. या निधीतून येथील रेल्वेस्थानकाला दोन प्रवेशद्वारांसह प्रशस्त लॉबी, पाथ वेसह पार्किंगमध्ये अनेक सोयी-सुविधा, प्लॅटफॉर्मवर सीओपीची सुविधा, नवीन अत्याधुनिक शौचालये, प्रवाशांसाठी आसनव्यवस्थेसह वेटिंग एरियामध्ये फर्निचरसह विविध सोयी-सुविधा, प्रवाशांना पिण्यासाठी आरोग्यदायी पाणी व्यवस्था, रेल्वेस्थानकाच्या इमारतीचे सौंदर्यीकरण, तसेच वेटिंग रूम, बुकिंग ऑफिस, प्रवेशद्वाराचे इंटेरिअर, प्रवाशांच्या माहितीसाठी इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड आदी सोयी-सुविधांचा समावेश आहे. धुळे येथील रेल्वे स्थानकातून मुंबईसाठी १८ डब्यांची रेल्वेगाडी रोज धावते आहे. तसेच दिवसातून तीन वेळा धुळे-चाळीसगाव दरम्यान मेमू ट्रेनही धावते आहे. तसेच आपल्या प्रयत्नाने धुळे-चाळीसगाव रेल्वेमार्गाचे संपूर्ण विद्युतीकरणही झाले आहे. धुळे-चाळीसगावदरम्यान धुळे शहरासह मोहाडी, सावळदे, बोरविहीर, शिरूड, चांदे, मोरदड तांडा येथे १५ गेटवर अंडरपासचे काम होत आहे. यासाठी ४१ कोटी रुपयांचा निधी आपण मंजूर करून घेतला आहे. तसेच शिंदखेडा तालुक्यातील नरडाणा, होळ, मेथी, शिंदखेडा, दोंडाईचा व सोनशेलू येथील नऊ गेटसाठी तब्बल ३६ कोटी रुपयांचा, असा एकूण ७७ कोटी रुपयांचा निधीही प्राप्त करून घेतला असून, या कामांचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते शिलान्यास होत आहे. जिल्हावासीयांच्या मागणीनुसार आपण मुंबईसाठी धुळ्याहून रोज एक्स्प्रेस रेल्वे सुरू केली आहे. या रेल्वेला धुळेकरांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, ही एक्स्प्रेस आता कायमस्वरूपी धावणार आहे. याशिवाय नागरिकांच्या मागणीनुसार आपण आता धुळे ते पुणे या रेल्वेसाठीही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यासह वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करत आहोत. येत्या सहा महिन्यांत धुळे-पुणे रेल्वेही धावू लागेल, अशी ग्वाहीही खासदार डॉ. भामरे यांनी यावेळी दिली.

यावेळी रेल्वेचे नोडल ऑफिसर शरद कोटेचा, दयाशंकर द्विवेदी, स्थानक अधीक्षक संतोष जाधव, नंदकुमार पाटील, भुसावळचे मुख्य कार्यालयीन अधीक्षक उमाकांत बावस्कर आदींनी संयोजन केले.




# रेल्वेचा विकास प्रवाशांच्या सोयीचा ठरणार

## अशोक चव्हाण यांचे प्रतिपादन : भोकरला अमृत स्टेशन योजनेचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** देशात भाजपाची सत्ता आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मूलभुत गरजा पूर्ण करण्यासाठी महत्वाच पाऊल ऊचलल आहे. रस्तेसूधारणा झाल्यावर आता रेल्वेचा विकास हाती घेण्यात आल्याने भविष्यात ते जनतेच्या सोयीच ठरणार आहे असे प्रतिपादन खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सोमवारी (ता.२६) केले आहे. "अमृत स्टेशन योजने" चा येथील रेल्वे स्थानकात भुमीपूजन सोहळा आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.व्यासपीठावर खासदार प्रताप पाटील चिखलीकर,माजी आमदार अमर राजूरकर, ओमप्रकाश पोकर्णा, भाजपाचे जिल्हाध्यक्ष कीशोर देशमुख, रेल्वेच्या उपविभागीय व्यवस्थापीका निता सरकार, जगदीश पाटील भोसीकर, विनोद चिंचाळकर, भगवान दंडवे, रामचंद्र मुसळे,गणेश कापसे, गणपत पिट्टेवाड, सुभाष किन्हाळकर,दिलीप सोनटक्के,कीशोर पाटील लगळुदकर,आत्रिक पाटील मुंगल,पंकज पोकलवार,माऊली पाटील चिंचाळकर यांची उपस्थिती होती. श्री.चव्हाण म्हणाले की, प्रारंभी मी खासदार असताना नांदेड येथे रेल्वे डीव्हीजन होण्यासाठी प्रयत्न केले त्यास यश मिळाल. भाजपा सरकारने रस्तेविकासाला चालना दिल्याने राष्ट्रीय महामार्ग, समृध्दी महामार्ग चकचकीत झाले आहेत.त्याबरोबर रेल्वे विकासहि तीतकाच महत्वाचा असल्याने कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याचा येणा-या काळात नक्कीच फायदा होईल. नागपूर, लातूर, पुणे,मूंबई, हैद्राबाद शहराचा संपर्क महत्वाचे आहे असे सांगितले. रेल्वेच्या विकासाची गती दिवसेनदिवस वाढते आहे.पूर्वी खासदाराची संख्या कमी होती आता ती वाढली आहे. ट्रिपल ईजींन सरकार आल्यान आणखी गती मिळणार आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेल्वे स्थानके अद्यावत करण्याचा संक़ल्प केला आहे.त्या निमित्ताने आज माझ्या मतदार संघातील भोकर रेल्वे स्थानकाचा कायापालट होणार आहे.मी खासदार व्हावे आणि माझ्या ऊपस्थितीत हा सोहळा पार पडवा हा योगायोग नियतीला मान्य असावा म्हणून हि संधी मिळाली आहे असे श्री.चव्हाण यांनी सांगितले आहे.

**सबका विकास होईल :** भारतीय जनता पक्षानी जनतेच्या मुलभूत गरजा पूर्ण केल्याने येणा–या काळात भाजपाच सत्तास्थानी असेल .जिल्ह्यातील नेते अशोक चव्हाण हे आमच्या सोबत आल्याने पक्षाला अधिक बळ मिळाल आहे .आम्हि दोघे मिळून एक दिलान काम करणार आहोत .या घटणेनी बरेचजण अचंबित झाले असावेत .येथील रेल्वे स्थानकात विविध सोयीसुविधा देण्यासाठी शासनाने अकरा कोटी रुपये दिले आहेत .सबका विकास होईल यात तिळमात्र शंका नाही . **खा . प्रताप पाटील चिखलीकर**

# जिल्हा औषधी भांडार नवीन इमारतीचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशातील विविध आरोग्य सेवा, पायाभुत सुविधा प्रकल्पाची पायाभरणी अंतर्गत आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा औषधी भांडारच्या नवीन इमारतीचे लोकार्पण मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहायक संचालक (आरोग्यसेवा) डॉ. आनंद गडीकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, सावलीचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. बंडू रामटेके, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. मंगेश गुलवाडे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य पुष्पा पोडे उपस्थित होत्या. यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, चंद्रपूर येथे नवीन औषध भांडाराचे तसेच तडाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी – कर्मचारी यांच्या निवासस्थानाचे लोकार्पण करण्यात आले आहे. जिल्ह्यात 65 प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र आहेत. यात औषधींचा साठा ठेवण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. या भांडाराच्या माध्यमातून एक चांगले औषध भांडार जिल्ह्यासाठी उपलब्ध झाले आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात आरोग्याच्या पायाभूत सुविधा, विस्तारीकरण, स्मार्ट पी.एच.सी. निर्माण करण्यात येत आहे. शहरातील खाजगी रुग्णालयाच्या धर्तीवर ग्रामीण भागात आरोग्याच्या सेवा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ. मंगेश गुलवाडे म्हणाले, पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आरोग्याच्या अत्याधुनिक सुविधा सर्वांपर्यंत पोहचविण्याचा संकल्प केला आहे. चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्रात आरोग्याच्या बाबतीत अग्रेसर राहावा, यासाठी पालकमंत्री सदैव प्रयत्नशील आहेत, असे ते म्हणाले. तत्पूर्वी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे देशातील विविध आरोग्य सेवा, पायाभुत सुविधा प्रकल्पाची पायाभरणी / लोकार्पण करण्यात आले. यावेळी चंद्रपूर येथे मान्यवरांच्या हस्ते फित कापून जिल्हा औषधी भांडारच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांनी तर आभार राकेश नाकोडे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा औषध भांडार मुळे ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांना औषध पुरवठा करण्याकरीता लागणा-या औषधांचा साठा करण्यास व व्यवस्थित जतन करून वितरीत करण्यास मदत होणार आहे.



# लोह्यात शिक्षक सेनेच्या वतीने माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना श्रद्धांजली

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा लोकसभेचे माजी सभापती शिवसेना नेते मनोहर जोशी यांचे नुकतेच दि. २३ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या या अकाली निधनाबद्दल लोहयात शिक्षक सेनेच्या वतीने तीव्र दुःख व्यक्त करुन शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठ्ठभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तातडीची बैठक घेऊन कै. मनोहर जोशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी बोलताना शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण म्हणाले की, कै. मनोहर जोशी हे सुरुवातीला शिक्षक होते. त्यांची शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावर फार निष्ठा होती ते शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू होते.जिवनाच्या शेवटच्या क्षणा पर्यंत ते निष्ठावंत शिवसैनिक होते त्यांनी शिवसेनेकडून नगरसेवक, महापौर, आमदार,विरोधी पक्ष नेते, राज्याचे मुख्यमंत्री, देशाच्या केंद्रीय मंत्रीसह संसदेतील लोकसभेचे सभापती म्हणून काम पाहिले .ते मुख्यमंत्री असतांना राज्यात त्यांनी झुनका भाकर केंद्र सुरु केले शिक्षणाचे विकेंद्रीकरण केले.

त्यांच्या निधनाने शिवसेनेची,राज्याची व देशाची कधी न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो असे विठुभाऊ चव्हाण म्हणाले.

यावेळी शिवसेनेचे लोहा तालुकाप्रमुख चंद्रकांत पाटील क्षीरसागर ,शिक्षक सेनेचे तालुकाध्यक्ष संभाजी पवार, मिडिया पोलिस सोशल क्लब पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विलास सावळे, पत्रकार सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवराज पाटील पवार, छायाचित्रकार विनोद महाबळे, शिक्षक सेनेचे तालूकासंपर्क प्रमुख लहू पंदलवाड सर, केंद्रप्रमुख तथा ता.संघटक संतोष जोशी सर,ता.सल्लागार वाय.पी.कुलकर्णी सर, संघटक सुभाष राठोड सर,राहूल बनसोडे परशुराम मिरेवाड सर सर,एस. आर.गायकवाड सर, शिरसाळकर एस,आंबादास राठोड सर, नामदेव जाधव सर,संजय जाधव सर, आर.जी. वाघमारे सह आदी उपस्थित होते.

# अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सचे स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** शनिवारी अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस, आसेगाव येथे वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अरुण जराड उपविभागीय अधिकारी वैजापूर,जनार्दन साळुंखे पोलीस निरीक्षक दौलताबाद शाळेचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव पल्हाळ अंजना प्रतिष्ठाण अध्यश्या स्मितताई पल्हाळ हे होते तसेच सचिव स्वरंजीत पल्हाळ, उपाध्यक्ष मोनिका पल्हाळ, मुख्याध्यापिका स्नेहा युवराज पवार, व्यवस्थापक देव साठे यांचा प्रयत्नातून संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले यावेळी संतोष आम्ले उपजिल्हा प्रमुख, सरपंच संगीता दीपक राजगुरू, संदेश बोऱ्हाडे, जनार्दन गवळी, राहुल वानखेडे, रफिक पठाण, लक्ष्मण तांबे, सुभाष पल्हाळ, प्रभू बागुल, शरद रावते, परमेश्वर कांबळे, कृष्णा खिलारे, मंगेश जाधव, बबन साठे ह्या प्रतिष्ठित व्यक्तीं उपस्थिती होते. वर्षभरातील सर्व सण व उत्सव आपण कशाप्रकारे साजरे केले पाहिजे ह्या बद्दल मुलांनी चांगल्या प्रकारे आपल्या नृत्याद्वारे व नाटकाद्वारे पालकांसमोर सादरीकरण केले. मुख्यतः आषाढी एकादशी, शेतकरी आत्महत्या व रामायण यासारख्या प्रमुख विषयावर कौतुस्पद असे नाटक सादर केले. त्यामध्ये उपस्थित पालकांकडून देखील कौतुकाचा वर्षाव अंजना स्कूल च्या मुलांवर करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन स्नेहा पवार यांनी केले तर मोनिका पल्हाळ यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.



# मराठा आरक्षणाला पाठिंब्यासाठी रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** राज्यात सर्वत्र मराठा समाजाला आरक्षण हा विषय ऐरणीवर आला असताना त्यास पाठींबा देण्यासाठी कोपरगाव तालुक्यातील धामोरी येथील बस स्थानकावर मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी काल सकाळी १०.५० वाजेच्या सुमारास 'रास्ता रोको आंदोलन' केले असता कोपरगाव तालुका पोलिसांनीं नारायण संपतराव मांजरे, ज्ञानदेव दगुजी मांजरे सुनील शिवाजी मांजरे यांचे सह २०-२५ जणांवर गुन्हा दाखल केल्याने धमोरीसह कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे.
मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देण्याचे विधेयक महाराष्ट्र सरकारने विधिमंडळात मंजूर केले आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी प्रवर्गात मराठा आरक्षणाची मागणी केली होती. पण,महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र दहा टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली आहे.मात्र, मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण हवे आहे, या मागणीवर मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. तसेच सगे सोयरेची मागणी मान्य केली जात नाही तोपर्यंत आजपासून दररोज दोन तास रास्ता रोको करण्याचे कार्यकर्त्यांना आदेश दिले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानंतर कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यांच्या या हाकेला 'ओ' देत कोपरगाव शहरातील साईबाबा चौक येथे मराठा समाजातील कार्यकर्त्यांनीं,'रास्ता रोको आंदोलन' केले होते. याची गंभीर दखल कोपरगाव तालुका पोलिसानी घेतली असून या कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यात नारायण संपतराव भाकरे, ज्ञानदेव दगुजी मांजरे, सुनील शिवाजी मांजरे,नारायण बारकू मांजरे, सचिन जना कुऱ्हाडे, शिवाजी काशिनाथ वाघ, सुनील विष्णू वाणी, अशोक दशरथ भाकरे,प्रकाश विश्वनाथ वाघ,व इतर २०-२५ जण अनोळखी नागरिक आदी विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# विज्ञानवादी संत रविदास यांचे विचार देशासाठी प्रेरणादायी : प्रा. डॉ. गोपाल बछिरे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** संत शिरोमणी गुरु रविदासांचे मानवतावादी विचार देशात प्रेरणादायी असे वक्तव्य गुरु रविदास जयंतीनिमित्त कार्यक्रमात प्रा. डॉ. गोपाल बछिरे यांनी केले. लोणार येथील शिवसेना भवनात संत शिरोमणी गुरु रविदास यांच्या जयंतीनिमित्त प्रा. डॉ. गोपाल बछिरे यांच्या अध्यक्षते खाली पार पडलेल्या कार्यक्रमात ॲड. दीपक मापारी यांनी संत रोहिदासांचे मानवतावादी विचार सांगितले, सुदन अंभोरे सरांनी रवीदासांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. गजानन जाधव सर यांनी संतांचे कार्य या देशात राष्ट्रीय एकात्मतेसाठी किती मौल्यवान ठरले याविषयी आपले मनोगत व्यक्त केले व अध्यक्षीय समारोपात डॉ. गोपाल बच्छीरे यांनी या विषयावर भाष्य केले.त्यांच्या डोह्यातून त्यांचे विचार येथे मांडण्याचा प्रयत्न केला व गुरु रविदास यांच्यावर बाबासाहेबांनी संशोधन करून



रविदासांचा जन्म माघ पौर्णिमा १५ फेब्रुवारी १३७७ ला झाला व १९५३ मध्ये पहिली जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी साजरी केली व तेव्हापासून रविदासांची जयंती साजरी होत आहे, असे सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शिवसेना उबाठा नेते विठ्ठलराव नागरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा शिवसेनेचे तालुका उपप्रमुख परमेश्वर दादा दहातोंडे, तालुका संघटक कैलास अंभोरे, शहर उपप्रमुख लुकमानभाई कुरेशी, अल्पसंख्यांक सेनेचे तालुकाप्रमुख उमरभाई सय्यद, विभाग प्रमुख राजूभाऊ बुधवत, शहर संघटक तानाजी मापारी, विभाग प्रमुख तानाजी अंभोरे, युवासेना तालुका उपप्रमुख अमोल सुटे, चित्रांक काटकर, मोरे साहेब, विनोद मोरे किशोर बच्छिरे किरण कमडे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक शाम राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन तानाजी मापारी यांनी केले.

# सावरकरांची दूरदृष्टी व राष्ट्रोद्धारक विचारांची देशाला गरज

## हंसराज अहीर : स्वातंत्र्यवीर स्मृती अभिवादन समारंभात प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर महान राष्ट्रभक्त, दूरदृष्टीचे भवितव्यवेता होते. त्याकाळी सैन्य शक्तीचे देशाकरीता असलेले महत्व विचारात घेत त्यांनी देशातील युवकांना सैन्यात भरती होवून राष्ट्रसेवेत आपले जीवन समर्पित करण्याचे आवाहन केले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची अग्नीवीर संकल्पना याच दूरदृष्टीतून असल्याचे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी सांगीतले.
चंद्रपूर महानगरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे दि. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित स्वातंत्र्यवीर स्मृती अभिवादन समारंभास उपस्थितांना संबोधित करतांना अहीर म्हणाले की, राष्ट्रद्रोही व देशाच्या शत्रुंशी लढण्यासाठी अग्नीवीर संकल्पना भावी काळात महत्वपूर्ण ठरणार आहे. स्वा. सावरकरांसारख्या योध्दा राष्ट्रपुरूषांचे स्मारक प्रत्येक ठिकाणी उभारून त्यांच्या राष्ट्र समर्पित कार्याची प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे अहीर याप्रसंगी म्हणाले.



या अभिवादन कार्यक्रमास खुशाल बोंडे, माजी महापौर अंजली घोटेकर, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, संदीप आवारी, गिरीष अणे, राजेंद्र अडपेवार, राजू घरोटे, विनोद शेरकी, सावरकर मंचाचे रवी येनारकर, सुरेश जुमडे, राजु वेलंकीवार तसेच ॲड. सुरेश तालेवार, पुनम तिवारी, श्रीकांत भोयर, राजेंद्र काणदेलवार, प्रमोद शास्त्रकार, रवी लोणकर, वंदना संतोषवार, अरूण तिखे, संजय जोशी, सुधीर टिकेकर, प्रकाश ताठे, चेतन शर्मा, वनसिंगेताई, इंगळे यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.
याप्रसंगी अंजली घोटेकर यांनी समयोचित विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रत्नाकर जैन यांनी तर संचालन व आभार प्रदर्शन गिरीष अणे यांनी केले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी स्वातंत्र्यवीरांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून त्यांच्या स्मृतिस अभिवादन केले.



# वाळूमाफिया विरुद्ध तहसीलदार मुजावर आक्रमक : २४ तासांत चार टिप्पर जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** तहसीलदार पदी वैशाली डोंगरजाळ व नायब तहसीलदार अस्मा मुजावर यांनी पदभार घेतल्या पासून वाळू माफिया विरुद्ध त्यांनी मोहीम तीव्र केली आहे.नायब तहसीलदार आस्मा मुजावर या तर रेतीमाफिया साठी कर्दनकाळ ठरत असून या पंधरवड्यात त्यांनी आठ वाहनावर कारवाई केली आहे त्यामुळे रेती माफियाचे धाबे चांगलेच दनाणले आहे. २४ फेब्रुवारी रोजी सरंबा फाट्यावर दोन टिप्पर जप्त करून अंढेरा पोलिसात अटकाव करण्यात आले.
तालुक्यात खडकपूर्णा नदी पात्रातून दररोज शेकडो ब्रास रेती चे अवैध उत्खनन करून जिल्ह्यासह जिल्हा बाहेर वाहतूक करण्यात येते.नायब तहसीलदार अस्मा मुजावर ह्या अवैध वाळू प्रतिबंधक पथकात गस्तीवर असताना नारायणखेड नजीक 24फेब्रुवारी रोजी सागर हरिचंद्र वांजोळ राहणार बोरगाव काकडे, प्रताप देविदास गवई रा एकलापूर ता रिसोड यांचे वाहन अडवून चौकशी केली असता अंदाजे चार ब्रास वाळू विना परवाना आढळून आली.टिप्पर .सदर टिप्पर जप्तीची कारवाई करून नायब तहसीलदार आसमा मुजावर यांनी अंढेरा पोलिसात अटकाव केले आहे.

# गाडगे महाराज जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** येथील परीट धोबी समाज महिला संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती (23 फेब्रुवारी ) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त रामेश्वर महादेव मंदिर कळंब येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले उपस्थित महिलांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले प्रसंगी माधवसिंग राजपूत यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जीवन कार्यावर विचार व्यक्त केले व स्वच्छतेचे तसेच समाज सुधारणे विषयीच्या कार्याचे महत्व सांगितले उपस्थित महिलांनी मंदिर परिसराची तसेच राष्ट्रसंत संत गाडगे महाराज चौक परिसराची स्वच्छता केली. या स्वच्छता मोहिमेत माजी नगरसेविका योजना वाघमारे, दुर्गा शिंदे, स्वाती दयाळ, शोभा जाधव, अंजली वाघमारे, शुभांगी वाघमारे, वैशाली वाघमारे, रंजना वाघमारे,पुजा वाघमारे, स्नेहा जोशी, कुसुम राऊत, समर्थ वाघमारे यांनी सहभाग घेतला उपस्थित महिलांचे आभार दुर्गा शिंदे यांनी मानले.



# वडोद बाजार येथे श्री परम पूज्य आचार्य १०८ विद्यासागरजी महाराज यांना विनयांजली

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे सकल जैन समाजाच्या वतीने श्री परमपूज्य आचार्य 1008 विद्यासागर जी महाराज यांच्या समाधी पर विनयांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वडोद बाजार येथील सकल जैन समाजाच्या वतीने वडोद बाजार येथील श्री 1008 आदिनाथ दिगंबर जैन मंदिरापासून गावातील धर्मशाळेपर्यंत श्री परमपूज्य आचार्य 108 विद्यासागर जी महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढून धर्मशाळेत प्रतिमेचे पूजन करण्यात आलं यावेळी वडोद बाजार येथील सकल जैन समाजाच्या महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते तर गावातील प्रतिष्ठित नागरिकांनीही या विनयांजली कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली विनय अंजली कार्यक्रमानिमित्त श्री परमपूज्य आचार्य 108 विद्यासागर जी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला काही मान्यवरांनी श्री परमपूज्य आचार्य 108 विद्यासागर जी महाराज यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली सकल जैन समाजाच्या महिला व पुरुषाच्या वतीने विनयजली कार्यक्रम संपन्न झाला.



# श्री सद्गुरू निरंजन रघुनाथ स्वामी यांचे मंदिर निर्माण कार्यासाठी भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** श्री दत्तभक्त वैराग्यमूर्ती श्री निरंजन रघुनाथ स्वामी जन्म (कार्तिक शुद्ध ८ शके१७०४ समाधीकाल भाद्रपद शुद्ध ११ शके १७७७ ) यांचे कळंब हे जन्मस्थान आहे दत्तभक्तित लीन होऊन त्यानी कळंब येथून प्रस्थान केले व पुढे ध्यानधारणा व तप केल्याने त्यांना अनुष्ठान प्राप्त झाले त्यांनी ज्ञानेश्वरी अमृत अनुभावावर , दत्तगुरुवर शंभर पदे ,व सद्गुरु रघुनाथ स्वामी (नाशिक) यांचे काव्यात्मक चरित्र लिहिले आहे त्यांचा जन्म कळंब येथील स्रोत्रे - कुलकर्णी दत्तभक्त परिवारात कसबा पेठ येथे झाला त्यांचे सुरुवातीची वीस वर्ष कळंब येथे वास्तव्य होते यानंतर गिरनार पर्वतावर त्यांनी तपश्चर्या केली त्यांचा मिरज येथे मठ आहे. सद्गुरु निरंजन रघुनाथ स्वामी यांचे कळंब हे जन्मगाव असल्याने जन्म ठिकाणी मंदिर निर्माण व्हावे ही कल्पना महाराजांचे सदभक्त यशवंत दशरथ यांनी मांडली व या कार्यास त्यांनी पुढाकार घेऊन मंदिर निर्माण कार्य हाती घेतली आहे शिवाजीराव कुलकर्णी यशवंत कुलकर्णी, निरंजन कुलकर्णी, दिनकराव, पोरे इंजि. अशोकराव पोरे ,अनंतराव देशमुख यांनी या मंदिर निर्माण कार्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे . या कार्यास दिनांक २१ फेब्रुवारी रोजी मूर्त स्वरूप आले त्यानिमित्ताने देऊळकर गणपती मंदिराजवळील त्यांच्या मूळनिवास ठिकाणी मंदिर निर्माण साठी भूमिपूजन कार्यक्रम घेण्यात आला या निमित्ताने , श्री गुरुदत्त, सद्गुरू शंकर महाराज ,सद्गुरु निरंजन रघुनाथ स्वामी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन तसेच बांधकाम कार्यासाठी भूमिपूजन कार्यक्रम घेण्यात आला याप्रसंगी श्री निरंजन रघुनाथ स्वामी महाराजांचे वंशज असलेले स्त्रोत्रे -- कुलकर्णी परिवारातील शिवाजीराव कुलकर्णी ,राजाभाऊ कुलकर्णी, श्रीकांत राव कुलकर्णी, प्रभाकर राव कुलकर्णी, श्रीराम कुलकर्णी, कमलाकरराव कुलकर्णी व दिनकरराव पोरे, इंजि. अशोकराव पोरे ,विलास खांडेकर , सुभाष हरदास, दर्शन पोरे, अरुण पंचुत्रे, सुनील देशमुख ,धनंजय कुलकर्णी, खंडेराव देशमुख, जगदीश गोरे ,संभाजी मोरे ,पुरुषोत्तम हुलसुलकर, रमाकांत कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, ऋषिकेश दशरथ, नागनाथ घुले, माधवसिंग राजपूत, ज्ञानदेव कदम, राजाभाऊ वाघमारे, नाना वाघमारे, मच्छिंद्र साखरे यांची उपस्थिती होती भूमिपूजन पौरोहित्य श्रीराम जोशी (केज) यांनी केले महाप्रसाद पंगत कळंब येथील अन्नदाते बंडोपंत दशरथ यांची होती. कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज असून सहकार्य करण्याची आवाहन यशवंतराव दशरथ व अशोकराव पोरे यांनी केले आहे.



# परिसंवाद विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक: प्र-कुलगुरू डॉ. कावळे

## विदर्भ युनिव्हर्सिटी विद्यार्थी परिसंवाद स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी परिसंवाद हे दिशादर्शक असतात, असे मत गोंडवाना विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांनी व्यक्त केले. शासकीय विज्ञान महाविद्यालय येथे नुकत्याच पार पडलेल्या विदर्भ युनिव्हर्सिटी विद्यार्थी परिसंवाद स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

पोस्टर प्रेजेंटेशन व सेमिनार प्रेजेंटेशन स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना गोंडवाना विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, प्राचार्य डॉ. प्रशांत जाखी, विदर्भ युनिव्हर्सिटी फिजिक्स टीचर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. किशोर रेवतकर तसेच सचिव डॉ. जितेंद्र रामटेके, कोषाध्यक्ष डॉ. देवेंद्र नंदनवार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रा. डॉ. सुभाष कोंडावर, यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली, गोंडवाना विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभाग, विदर्भ युनिव्हर्सिटी फिजिक्स टीचर असोसिएशन व शासकीय विज्ञान महाविद्यालय गडचिरोली यांच्या वतीने या दोन दिवसीय विद्यार्थी परिसंवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे म्हणाले, भौतिकशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेली ही स्पर्धा विद्यापीठाद्वारे प्रथमच घेण्यात आली. ही बाब फारच कौतुकास्पद असून निश्चितच यामधुन विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला चालना मिळेल. प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभागाचे स. प्रा. डॉ. नंदकिशोर मेश्राम यांनी केले, आभार स. प्रा. विकास पुनसे यांनी मानले ,तर संचालन स. प्रा.डॉ. अपर्णा भाके यांनी केले.



यांप्रसंगी डॉ. मोहरकर, गणित विभागाचे प्रा.डॉ. सुनील बागडे, स. प्रा.डॉ. प्रितेश जाधव आदी मान्यवरांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोन दिवसीय परिसंवादादरम्यान विद्यार्थ्यांना डॉ. सुधीर टिपले यांनी टेलिस्कोपद्वारे चंद्र व ग्रह यांचे निरीक्षण करवून मार्गदर्शनही केले.

स्पर्धेमध्ये विदर्भातील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तसेच गोंडवाना विद्यापीठातील २८ महाविद्यालयातील १४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भौतिकशास्त्राच्या स. प्रा. सहकार्य केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांची मोठयासंख्येने उपस्थिती होती.

# गुरु रविदासांना दैववादी करु नका : गिरीश बनकर

## लोणंद येथे संत गुरु रविदास जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मानवतावादी संतांना दैववादी करून मनुवादी लोकांनी आजपर्यंत गुरू रविदासांना चमत्कारी स्वरूपात मांडण्याचं मोठं कपट केलेलं आहे.परंतु गुरू रविदास हे दैववादी संत नव्हते तर ते पुरोगामी विचारांचे मानवतावादी संत होते.हे समाजाला कळायला हवं. म्हणून संत रविदासांना अख्यायिका आणि मिथकाच्या पलीकडे जाऊन आपण समजून घेणं आज मितीला गरजेचं आहे.गुरू रविदासांना दैववादी करू नका. असे प्रतिपादन पुरोगामी चळवळीतील युवा विचारवंत गिरीश बनकर यांनी केले.ते लोणंद ता.खंडाळा येथे श्री गुरु रविदास मंदिर ट्रस्ट,क्रांती संत गुरु रविदास जयंती उत्सव समिती,समस्त डोईफोडे हितवर्धक संस्था (रजि., ),समस्त हराळे वैष्णव चर्मकार समाज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रांती संत गुरु रविदास यांच्या जयंती सोहळा कार्यक्रमातून बोलत होते. मुख्य प्रवर्तक रवींद्र खंडेराव डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न होत असताना कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सिमा खरात होत्या.राष्ट्रवादी काँ.पार्टीचे सातारा जिल्हा उपाध्यक्ष दयानंद खरात,सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील,डॉ.नितीन सावंत विचारमंचचे अध्यक्ष डॉ.नितीन सावंत,माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव सोपानराव शेळके-पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल शेळके- पाटील,खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती विनोद(दादा) क्षीरसागर,खंडाळा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष



अॅड.सर्फराज बागवान, सुन्नी मुस्लीम जमातीचे अध्यक्ष राजुभाई कुरेशी, लोणंद इंजिनीयर अॅन्ड आर्किटेक्ट असोसिएशनचे सचिव इम्रान बागवान,माजी सरपंच देवकीबाई डोईफोडे, डी.वाय.एस.पी. राजेंद्र शेळके पाटील, समस्त डोईफोडे हितवर्धक संघटनेचे अध्यक्ष आनंदराव डोईफोडे,माजी उपनगराध्यक्ष शिवाजीराव शेळके-पाटील, नगरसेवक सागर शेळके पाटील, खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश ननावरे, हराळे वैष्णव चर्मकार समाज खंडाळा तालुकाध्यक्ष बबनराव हिराजी डोईफोडे,खंडाळा खरेदी विक्रीची संघाचे माजी चेअरमन बबनराव शेळके पाटील, ज्येष्ठ समाजसेवक एन.डी.अण्णा क्षीरसागर, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय खरात, प्रा.रघुनाथ शेळके पाटील, रोहिदास दिंडी २४ क्रमांकचे अध्यक्ष रोहिदास उगले, नगरसेवक गणीभाई कच्छी,माजी उपसरपंच राहुल घाडगे, युवा उद्योजक निलेश शेळके-पाटील,वारकरी संप्रदायचे सत्वशिल शेळके-पाटील, संदीप शेळके-पाटील, वैभव उर्फ बंटी खरात, राजाभाऊ खरात आदी मान्यवरांसह समाज बांधव उपस्थित होते. गिरीश बनकर पुढे म्हणाले की,भारताच्या इतिहासातील सर्वात प्रभावी संत म्हणून रविदासांची ओळख आहे. भारत भ्रमण करत असताना आंध्र प्रदेश ते हिमाचल प्रदेश असा वेगवेगळ्या धार्मिक स्थळी भेट देऊन मानवतेचा संदेश देत होते.विशेष म्हणजे गुरु रविदास हे भारतात जवळपास १६ वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात.भारत हा कृषी प्रधान देश आहे तर देशातली कृषी व्यवस्था आज एवढी दीन का आहे?असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.जगात भारताची ओळख बुध्दाचा देश म्हणून ओळख आहे मग आम्ही आजपर्यंत बुद्ध विचार कां स्वीकारू शकलो नाही? याचं चिंतन करणे गरजेचं आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री गुरू रविदास मंदीर ट्रस्ट लोणंद, तसेच ट्रस्टचे अध्यक्ष हरीचंद्र बबनराव डोईफोडे, विश्वस्त प्रशांत डोईफोडे, गणेश भुजंग डोईफोडे, भालचंद्र डोईफोडे, सागर डोईफोडे, निलेश डोईफोडे, उमेश डोईफोडे, राजेंद्र डोईफोडे, रमेश डोईफोडे, दत्तात्रय डोईफोडे, दीपक डोईफोडे, राजेश डोईफोडे, गणेश डोईफोडे, प्रकाश डोईफोडे, अभिषेक डोईफोडे, आकाश डोईफोडे, अमित पवार, संजय कांबळे, दुर्गेश टिके, सुमित टिके, दीपक पवार, विकास ननावरे, राजेश ननावरे, नितीन डोईफोडे समस्त डोईफोडे हितवर्धक संस्था (रजि.) पदाधिकारी व समस्त हराळे चर्मकार समाज लोणंद व क्रांतिसंत गुरू रविदास जयंती उत्सव समिती लोणंद आदींनी विशेष प्रयत्न केले.

# संत निरंकारी मंडळमार्फत जल स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे संत निरंकारी मंडळ ब्रँच बाजार सावंगी अंतर्गत तसेच चौका, पाथ्री, गणोरी, बिल्डा, पाल, फुलंब्री, जातेगाव, वाहेगाव, निधोना, बोरगाव अर्ज, जेठे वस्ती, सताळा, विटेकरवाडी, आखातवाडा तांडा, शेखपूरवाडी, ममूराबाद वाडी यांच्यातर्फे फुलंब्री शहरातील फुलमस्ता नदी बाजारपेठ परिसरात जल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळेस बाजार सावंगी ब्रँचचे मुखी श्री.एस. बी. नलावडे, चौका ब्रांचचे मुखी ढाकणे महात्मा, पाथ्री ब्रांचचे मुखी विकास भालेजी महात्मा आणि सर्वच ब्रांच सेवादल बंधू भगिनी उपस्थित होते. "संत निरंकारी मंडळ संपूर्ण जगामध्ये सदगुरु सुदीक्षा माताजी यांच्या आशिर्वादाने प्रत्येक वर्षी रेल्वे स्टेशन, सरकारी दवाखाने, बस स्थानक या ठिकाणी संपूर्ण देशभरात स्वच्छता अभियान राबवित आले आहे. मागील वर्षी पासून जल स्वच्छतेचा वसा निरंकारी मंडळाने घेतला असून "स्वच्छ जल, स्वच्छ मन" या उक्ती प्रमाणे जागृती वाढावी यासाठी "प्रोजेक्ट अमृत" या अभियानाखाली भारत सरकार सोबत जलस्वच्छता अभियान राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणुन आज भारतभर 1800 हून अधिक ठिकाणी नदी, ओढे, तलाव स्वच्छ करण्यात येत आहेत, याच अनुषंगाने फुलंब्री येथे स्वच्छता अभियान यशस्वीरित्या घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या साठी माजी विधानपरिषद अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडेजी (नाना), सौ. अनुराधाताई चव्हाण, मार्केट कमिटी सभापती सुहासभाऊ सिरसाठ, सांडुजी जाधव, सरलाताई तांदळे, ज्योतीताई वहाटुळे, रेखाताई आटुळे, यांनी भेट दिली असता सर्वांनी या उपक्रमाची स्तुती करून यात सहभाग नोंदवला.





# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सत्ताधारी, विरोधकही गप्प

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** सत्ताधारी आणि विरोधक दोघेही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गप्प असल्याची टीका शेतकरी संघटनेचे दामू इंगोले यांनी रिसोड तालुक्यातील आसेगाव पेन येथील कर्ज मुक्ती सभेमध्ये बोलतांना केली आहे. विरोधक असो वा सत्ताधारी यांना काहीही करून फक्त सत्तेत यायचय. शेतमालाला भाव नाही, दुष्काळी मदत अद्यापही मिळाली नाही जो काही तोकडा पीकविमा शेतकऱ्यांना मिळाला तो फक्त स्वाभिमानी मुळे हे शेतकरी जाणून आहेत. तसेच उर्वरित शेतकऱ्यांना देखील त्यांच्या हक्काचा पीकविमा मिळवून दिल्या शिवाय स्वाभिमानी गप्प बसणार नाही. म्हणून शेतकऱ्यांनो तुम्ही लक्षात ठेवा राजकारणी फक्त निवडणुकीलाच पावतात. जातीपातीचे राजकारण न करता आपले प्रश्न मांडणारा लोकप्रतिनिधी विधानभवनात पाठवा जेणे करून शेतकऱ्याच्या प्रश्नाना वाचा फुटेल. म्हणून आता आपण कर्जमुक्तीसाठी सरकारवर दबाव वाढवला पाहिजे, यानिमित्ताने किमान तेवढे तरी शेतकऱ्यांच्या पदरात पडेल. सरकारनेही जसे मोठ्या उद्योगपतींचे कर्ज माफ केले तसेच शेतकऱ्यांचेही सरसकट कर्ज माफ करावे असं वक्तव्य स्वाभिमानीचे युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांनी रिसोडच्या आसेगाव पेन येथे कर्जमुक्ती सभेत बोलतांना केलं.

केंद्र सरकारने महागाई नियंत्रित ठेवण्याच्या नावाखाली सोयाबीनचे भाव पाडले, त्यामुळं इच्छा असूनही शेतकरी कर्ज भरू शकत नाही.त्यामुळे सरकारने कर्ज माफी करावी. अन्यथा शेतकरी मतदान करतांना याचा नक्की विचार करतील असा इशाराही त्यांनी दिला. आसेगाव पेन येथील सभेला पंचक्रोशीतील हजारो शेतकरी यावेळी उपस्थित होते.

# ना. मु. वासनिक विद्यालयात निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** 25 फेब्रुवारी रोजी ना. मुकुल वासनिक विद्यालय आडोळ बु. इयत्ता १० वी च्या बॅचचा निरोप समारंभ कार्यक्रम अतिशय उत्साह व भावपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी संस्थेच्या संचालिका आशाताई दाभाडे तसेच गौरव दाभाडे संस्थेच्या सदस्या धुंदाळे मॅडम उपस्थित होत्या. सर्वप्रथम कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यांप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बुद्ध वासी कालकथित धुंदाळे साहेब यांच्या प्रतिमेचे अनावरण व पूजन करण्यात आले. यावेळी साहेबांच्या आठवणीने सर्वांना अश्रू अनावर झाले होते. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री साटोटे सर यांनी केले विद्यार्थ्यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले तसेच धांडे सर राजवैद्य सर यांनी आपले विचार मांडले कार्यक्रमाचे अध्यक्ष ठोंबरे सर यांनी अध्यक्षीय भाषण केले. माननीय आशाताई यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचलन राजवैद्य सर यांनी केले तर आभार प्रदर्शन भिवटे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# सविता मुंढे यांना रणरागिणी पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**देऊळगाव राजा :** जिल्हा परिषदे च्या माजी सदस्य, तथा वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा सविता मुंढे यांना जागतिक महिला दिनाच्या निमित्त वेध फौंडेशन आयोजित "रणरागिणी नॅशनल अवॉर्ड " जाहीर करण्यात आला आहे. येत्या 8 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त शिवाजीराव देशमुख सभागृह, रामलीला मैदान हिंगोली येथे त्यांना रणरागिनी नॅशनल अवॉर्ड २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सविता मुंडे यांनी जिल्हा परिषद सदस्य असताना शेतकरी सर्वसामान्य नागरिक आणि महिलांच्या प्रश्नावर आक्रमकतेने आंदोलने करून सामान्यांना न्याय मिळवून दिला. राजकीय सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची वेध फाउंडेशनच्या स्वाती मोराळे यांनी दखल घेत रणरागिनी नॅशनल अवॉर्ड जाहीर केला आहे. सविता मुंडे यांना जाहीर झालेल्या या पुरस्कारा बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# शबेबारात मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी जामा मस्जिद येथे दि.२५ शबे बारात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. १२मार्च पासून पवित्र रमजान महिना सुरु होत असुण वर्षांतील शबेमेहराज शबेबारात शबेकदर (सत्ताविसशब) ही तीन रात्री अतिशय महत्त्वाचा आहे. यात दि.२५फेब्रुवारी रविवार रोजी शबेबरात असल्याने जामा मस्जिद लगतच्या सर्व मुस्लिम बांधवांनी आपली हजेरी मस्जिद मध्ये लावून नमाजे इशा नंतर मागील कजा नमाज, कुरान पठण, तीजवी करत व येणाऱ्या रमजान महिन्यात रमजान चे उपवास,नमाज सर्व अमल पुर्ण होऊ दे यांसाठी, स्वतः साठी कुटुंबासाठी देशासाठी, जगासाठी, अमन, शांती, स्वह्द साठी दुआ केली. यासाठी मोठ्या संख्येने मुस्लिम तरुण वयवृध्द एकत्रीत आजरोजी जमा झाले होते.

# साई संस्थान सोसायटीच्या चेअरमनपदी पवार तर व्हाईस चेअरमनपदी कोते

## संस्थेची इमारत पूर्ण होईपर्यंत खुर्चीवर बसणार नाही पवार

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटीच्या चेअरमनपदी विठ्ठल तुकाराम पवार तर व्हाईस चअरमनपदी पोपटराव भास्कर कोते यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

नगर जिल्ह्यात अग्रगण्य समजण्या जाणाऱ्या शिर्डी साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमनची निवड प्रक्रिया शनिवारी सहाय्यक निबंधक रावसाहेब खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या निवड प्रक्रियेत





नूतन चेअरमन म्हणून विठ्ठल पवार तर व्हाईस चेअरमन म्हणून पोपटराव कोते यांची सर्व संचालक मंडळाच्या वतीने निवड करण्यात आली. मागील महिन्यात साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीची निवडणूक संपूर्ण जिल्ह्यात गाजली. ही निवडणूक तिन्ही पॅनलच्या उमेदवारांनी प्रतिष्ठेची केली होती. परिवर्तन विकास मंडळांनी या निवडणुकीत सत्तांतर घडवून आणले. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना विठ्ठल पवार म्हणाले निवडणूक झाले आता राजकारण बाजूला ठेवून कामाला सुरुवात करायची आहे. संस्थेची स्वतःची इमारत नाही. ती पूर्ण होईपर्यंत मी चेअरमनच्या खुर्चीवर बसणार नाही. सभासदांच्या भावना नवीन इमारतीत गुंतल्या आहे. संस्थेचे घरटे पूर्ण करण्याची जबाबदारी संचालक मंडळावर आहे. संस्थेचा लौकिक कसा वाढेल याकडे लक्ष देणार असून सभासदांनी कामे सांगावीत ती आम्ही पूर्ण करू २७ फेब्रुवारीला संत पुजनाचा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे पवार यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे सचिव नाबाजी डांगे, सहसचिव विलास वाणी, अशोक कोते, बाळासाहेब कोते, भाऊसाहेब लबडे, नवनाथ थोरे तसेच संचालक विनोद कोते, रवींद्र गायकवाड, देविदास जगताप, भाऊसाहेब कोकाटे, संभाजी तुरकणे, महादू कांदळकर, कृष्णा आरणे, इकबाल तांबोळी, मिलिंद दुनबळे, तुळशीराम पवार, भाऊसाहेब लवांडे, गणेश अहिरे, संभाजी गागरे, सुनंदा जगताप, लता बारसे, तसेच आदी संस्थेचे कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

# १६ लाखांच्या मुद्देमालासह मोटारसायकल चोरांची टोळी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** श्रीरामपूर शहर पोलिसांनी मोठी कारवाई करत शेतीमालासह दुचाकी चोरी करणा-या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा पडदाफाश करत १६ लाख रुपयांच्या मोटारसायकलींसह ७ आरोपींना गजाआड केले. श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खंडाळा येथील शेतकऱ्याच्या शेतातून ३०० किलो अद्रक चोरी गेल्या संदर्भात दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान, श्रीरामपूर शहर पोलिसांनी दुचाकी चोरीतील सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा पडदाफाश करून. चोरीस गेलेल्या १६ लाख रुपये किमतीच्या १७ दुचाकींसह आरोपी



ऋषीकेश कैलास जाधव, वय वर्षे ३०, दिलीप मोहन आढाव वय वर्षे ५२, किरण संतोष मोरे, वय वर्षे १९, दानिश मोहम्मद सय्यद, गौरव बागुल, संदीप सुडगे व मालेगाव येथील रियाज हुसनीद्दीन शेख या ७ सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी जेरबंद केलं असून. आरोपीं विरोधात भादंवि कलम ३६९ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपूजे यांनी दिली.

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने बल्लारपूर शहरातील रविवार बाजार येथील चर्च जवळ संपर्क प्रमुख प्रशांत कदम यांच्या हस्ते जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे व उपजिल्हाप्रमुख सिक्की यादव यांच्या उपस्थितीत जन तक्रार निवारण, जनहित, जनसंपर्क कार्यालयाचे मोठ्या थाटामाटात फटाके आणि टाळ्यांच्या गजरात उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमात शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांचा आदर्श व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे, उपजिल्हाप्रमुख माजी नगरसेवक सिक्की यादव यांच्या पुढाकाराने विभिन्न सामाजिक संघटना, पक्षाचे कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेश केलेल्या सर्व महिला व पुरुष शिवसैनिकांचे स्वागत संपर्कप्रमुख प्रशांत कदम, जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे, उपजिल्हाप्रमुख सिक्की यादव यांनी केले, तर महिला कार्यकर्त्यांचे स्वागत बल्लारपूर विधानसभा अध्यक्ष कल्पना गोरघाटे व माजी नगरसेविका रंजिता बिरे यांनी भगवा दुपट्टा परिधान करून केला. यावेळी आपल्या भाषणात जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे म्हणाले की, वाढती बेरोजगारी, गुन्हेगारी, महिला अत्याचार यासह प्रशासनाकडून सुचविलेल्या योजना खालच्या स्तरापर्यंत पोहोचत नसल्याने गरजूंना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी शिवसेना जनसंपर्क कार्यालयाची स्थापना केली. या कार्यक्रमात शिवसेना पक्षात प्रवेश करण्यामध्ये प्रामुख्याने बीएसपी चे माजी नगरसेवक राऊत, सतीश नंदाराम काँग्रेस उपाध्यक्ष, परीष महाजनवार काँग्रेस सोशल मीडिया प्रमुख, सामाजीक कार्यकर्ते प्रशांत मेश्राम, सचिन अंबादे, मनसे कार्यकर्ता शुभम बैस, शुभम ठाकूर, रियाज शेख, प्रशांत गद्दाला (बीआरएस), सोनू खान, मोनू शर्मा, शिफ्रांन खान, नागू परमार, येबल जोग, सतीश चुनियाने, सुधीर कालेपेल्ली मल्लेश जनाराम, राकेश ओडपेल्ली सह विभिन्न सामाजीक संघटनचे कार्यकर्ते प्रवेश केले. कार्यक्रमात मुख्य उपस्थिती जिजा फाउंडेशन अध्यक्षा मनस्वी संदिप



गिरहे यांची होती. यावेळी माजी जिल्हा प्रमुख दिलीप कपूर, बल्लारपुर तालुका प्रमुख प्रकाश पाठक, तालुका समन्वयक प्रदीप गेडाम, शहर प्रमुख बाबा शाहू, ॲड. प्रणय काकडे, विधानसभा प्रमुख प्रमोद पाटील, युवासेना जिल्हा प्रमुख विक्रांत सहारे, उपजिल्हा प्रमुख शालिक फाले, उपजिल्हा प्रमुख बबन उरकुडे, तालुका प्रमुख प्रशांत गट्टुवार, तालुका प्रमुख आशीष कावटवार, सागर ठाकुरवार, आनंद हनुमंतू, शेख युसूफ, प्रभाकर मुरकुटे, जीवन बुटले, विनोद बुराडे, रामू मेदरवार, रतिन चक्रवर्ती, सुरेंद्र संधू, बॉबी कादासी, कैलास मोटघरे, उप सरपंच अक्षय देरकर, सुनील दूधबळे, राजू बुरांडे, ऋषीं पीपरे, धर्मा बनोत, तुलसी बनोत, छोटू बेंबन्सी, सोनू बेंबन्सी, पप्पू बेंबन्सी, गौरव नाडमवार, अनिकेत बेलखेडे, अरूण पडाल, पवन साडवे, सुधाकर पोपले, मनीष गोरघाटे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख बल्लारपुर विधान सभा कल्पना गोरघाटे, महिला जिल्हा प्रमुख उज्वला नलगे, शहर प्रमुख चंद्रपूर वर्षा कोटेकर उप जिला प्रमुख सुवर्णा मुरकुटे, तालुका संघटीका मीनाक्षी गलघट, शहर संघटीका ज्योती गेहलोत, तालुका समन्वयक व पुर्व नगरसेविका रंजीता बीरे, युवती सेना शहर अध्यक्षा अंजली सोमबंसी, सरपंच देरकर, उपसरपंच राजूरकर, ज्योती गुप्ता, सीमा जैस्वार सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यालय उदघाटन मे बल्लारपूर के व्यापारी मंडळ, प्रतिष्ठित नागरिक, काँग्रेस, राष्ट्रवादी, संभाजी ब्रिगेड, वंचित आघाडी चे कार्यकर्ते व पदाधिकारी शुभेच्या देऊन भेट दिली. विशेष करून सुरेश भैया गिदवानी यांनी कार्यालय करीता जागा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच सिक्की यादव यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना शिवसेना मजबुत करण्याचे आव्हान केले.

# अवैध तंबाखूवर एलसीबीची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** राज्यात सुगंधित तंबाखूच्या विक्रीवर आणि वापरावर बंदी असतानाही शहरातील प्रत्येक रस्त्यावर आणि चौकाचौकात असलेल्या पान टपरीवर त्याची खुलेआम विक्री सुरू आहे. बंदीनंतर लोक तंबाखूपासून बनवलेल्या पदार्थांच्या सेवनाने कॅन्सरसारख्या भयंकर आजारांना आमंत्रण देत आहेत. या व्यतिरिक्त चंद्रपूर व बल्लारपूर येथील तरुणांना गांजा, अंमली पदार्थ, गरदा, गुटखा, फ्लेवरयुक्त तंबाखू, बनावट दारू ही सर्व अवैध दारू सहज उपलब्ध होत आहे. महाराष्ट्रात तंबाखूवर बंदी असतानाही तंबाखूची खुलेआम विक्री होते आणि मग आपले पोलीस ते पकडून त्यांच्या पाठीवर थाप मारून मोकळी जागा लुटताना दिसतात. बल्लारपूर येथील महाराणा प्रताप वॉर्डात असलेल्या अशोक बांबोडे यांच्या घरावर



स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत सुमारे १ लाख ४५ हजार किंमतीचा सुगंधित तंबाखू व गुटखा जप्त केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास गायकवाड आणि त्यांच्या पथक ने केली. मात्र हे अवैध धंदे स्थानिक पोलीस खात्याच्या नजरेस का पडत नाहीत?



# समाजाच्या उन्नतीसाठी सेवाभावी संस्थेने कार्य करावे

## आ. सुधाकर अडबाले : शब्दांकुर फाऊंडेशनतर्फे आमदार सुधाकर अडबाले यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपीपरी :** निसर्ग सखा संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त निसर्ग महोत्सव २०२४ अंतर्गत निसर्ग सखा बहुउद्देशीय संस्था व शब्दांकुर फाउंडेशनच्या वतीने कवी संमेलन तथा सत्कार सोहळा कार्यक्रम गोंडपिपरी येथे मोठया उत्साहात पार पडला. उद्घाटक तथा सत्कारमूर्ती म्हणून मा.सुधाकर अडबाले विधान परिषद सदस्य (म.रा.) कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून मा.उद्धव नारनवरे ज्येष्ठ साहित्यिक गोंडीपिपरी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी होते तर मा. प्रा.संतोष बांदुरकर स्वागताध्यक्ष जनता कनिष्ठ महाविद्यालय गोंडपिपरी, दीपक वांढरे संस्थाध्यक्ष निसर्ग सखा, शालिक माऊलीकर,राष्ट्रीय उपाध्यक्ष अखिल भारतीय राज्य सरकारी पेन्शनर्स महासंघ,मा.राजू झाडे अध्यक्ष तालुका पत्रकार संघ गोंडपिपरी,मा. समीर निमगडे पत्रकार तथा संचालक कृ.उ बाजार समिती गोंडपिपरी प्रभाकर पारखी प्रसिद्धी प्रमुख विमाशी,प्रकाश कुंभारे सेवानिवृत्त प्राचार्य जनता महाविद्यालय कोठारी, विजय झाडे अध्यक्ष विमाशी शाखा गोंडपीपरी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सर्वप्रथम सुधाकर अडबाले विधान परिषद सदस्य यांचा शब्दांकूर फाउंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला व त्यांनी केलेल्या कार्याचे यथोचित वाचन अरुण कुत्तमारे यांनी केले तसेच गोंडपीपरी तालुका जुनी पेंशन संघटना,विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटना,विज्युक्ता,गोंडपीपरी तालुका पुरोगामी शिक्षक संघटना,चिंतामणी कॉलेज गोंडपीपरी इत्यादी संघटना व प्रतिनिधीनी सत्कार केला. त्याचसोबत अखिल भारतीय सैनिक शाळा महासंघ, शब्दांकूर फाऊंडेशन,अवघड क्षेत्राच्या बदल्या करण्यात याव्या अश्या विविध समस्याचे निवेदन नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले साहेबांना देण्यात आले. दुसऱ्या सत्रात शब्दांकुर फाऊंडेशनच्या वतीने काव्य



मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी उद्धव नारनवरे होते त्यात संतोष कुमार उइके, तानाजी अल्लीवार, उज्वल त्रिनगरीवार, देवानंद रामगीरकर, अरुणा जांभुळकर, लक्ष्मी वराटे, प्रा.कमल खोब्रागडे, संगीता बांबोळे, रजनी दुब्बावार, निशिगंधा गहाणे, शरद लखेकर, गजानन बोबडे, तेजल हमंद, नंदिनी कोहपरे, माडुरवार साहेब, प्रेमानंद गौरकार,किशोर पाईकवार, नंदकिशोर तितरमारे, किशोर चलाख, दुशांत निमकर, उद्धव इत्यादी कवींनी बहारदार अशा रचना सादर केल्या. सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन शब्दांकुर फाउंडेशनचे अध्यक्ष दुशांत निमकर यांनी तर कवी संमेलनाचे सूत्रसंचालन शब्दांकूर फाउंडेशनचे उपाध्यक्ष किशोर चलाख यांनी केले.सर्व कवींना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शब्दांकूर फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी तसेच निसर्ग सखा संस्थेचे सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

> समाजाच्या उद्धारासाठी विनामूल्य या सेवाभावी संस्था कार्य करीत असतात .समाजाचे आपण देणं लागतो ही भावना त्यांच्यात भरलेली असणे अत्यंत आवश्यक आहे . म्हणूनच काव्यसम्मेलनाचे आयोजन करण्यात येत आहे यातून समाजाचे प्रतिबिंब कवींच्या कवितेतून यायलाच हवे . **आमदार सुधाकर अडबाले**



# प्रथमच पोलीस विभागाकडून ८४ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील पेस कौशल्य केंद्र येथे विद्यार्थ्यांना विविध ट्रेड प्रशिक्षण घेतलेल्यांना विविध ठिकाणी नौकरी साठी नामांकित कंपन्यांचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. पेस कौशल्य प्रशिक्षण केंद्र खुलताबाद येथे दि.24 फेब्रुवारी 2024 रोजी हॉस्पिटॅलिटी, इलेक्ट्रिकल्स अँड सोलर ,हेल्थकेअर व वेल्डिंग प्रशिक्षण पूर्ण केलेल्या 84 युवक युवतींना पंचतारांकित हॉटेल्स व नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळाली आहे त्यांची नियुक्ती पत्रे व प्रमाणपत्रे प्रमुख पाहुणे मा. वीरेंद्र मिश्रा छत्रपती संभाजी नगर परीक्षेत्र व मा. मनीष कलवानिया पोलीस अधीक्षक छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी किशोर भामरे यांनी आपल्या भाषणात व प्रस्ताविकामध्ये विभागप्रमुख श्री. दामोदर सर यांनी प्रथम करीत असलेल्या विविध कार्याची ओळख करून दिली.

या वेळी वीरेंद्र मिश्रा यांनी प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन मार्फत सुरु असलेल्या विविध
समाजोपयोगी उपक्रमांची माहिती जाणून घेतली व प्रथम करीत असलेल्या कार्याचे कौतुक केले. युवकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास, चिकाटी, कर्तव्याची जाणीव आणि आलेल्या परिस्थितीवर मात करने आवश्यक आहे. तेव्हाच आपण यशाला सहज गवसणी घालू शकतो. तुम्हाला नोकरी मिळाली आहे आणि तुम्ही आता आयुष्यातील एक टप्पा पार केलेला आहे त्यामुळे आपण यशस्वी लोकांच्या रांगेत कसे टिकून राहू यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कोणतेही काम श्रेष्ठ किंवा कनिष्ठ दर्जाचे नसते. आपल्या कामातूनच आपली ओळख निर्माण होत असते. यूपीएससी परीक्षेमध्ये सुद्धा असेच लोक यशस्वी होतात ज्यांनी छोट्या मोठ्या कामापासून सुरुवात केलेली आहे.

पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी सुद्धा आपण आपल्या ध्येय्यावर ठाम असल्यास कितीही कठीण परिस्थिती असली तरी सुद्धा योग्य नियोजमुळे आपण ध्येय सहज प्राप्त करू शकतो. असे सांगितले. आज जरी तुम्हाला दहा-बारा हजार रुपये मिळत असले तरी येणाऱ्या काळामध्ये तुम्ही उच्च पदापर्यंत जाऊ शकता.याप्रसंगी नोकरी मिळालेल्या प्रशिक्षणार्थी व त्यांच्या पालकांनी आपले विचार व्यक्त केले तसेच प्रथम पोलीस विभागाकडून झालेल्या मदती बद्दल कृतज्ञता व्यक्त केली.पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या संकल्पनेतून सहा जानेवारी 2024 रोजी प्रथम व पोलीस विभागाकडून घेण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यातून या युवकांची नोंदणी झालेली होती.

या कार्यक्रमासाठी जयप्रकाश शिरसाठ, श्री शशिकांत दुशिंग, अमोल जाधव पुरुषोत्तम सर, दिनेश पाटील, मुकेश दुशिंग, आशिष चहारे, योगेश आव्हाळे, गोविंद तांगडे, नारायण चांडेल, आकाश कुकडे, मनीषा बिलेवार, कविता लोंढे, अश्फाक सय्यद, गणेश दाभाडे, योगेश शिंदे, योगेश थोरात, प्रतीक्षा कल्याणकर, भास्कर देवकर, सर्व स्टाफ तसेच अनेक पालक व पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीहरी जाधव यांनी केले तर दिवाकर भोयार यांनी आभार मानले. सर्व स्टाफ व विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली होती.

# सरकारला आशा सेविकांची कदर नाही : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आझाद मैदानावर आशा सेविकांचे वेतनवाढीसह अन्य प्रलंबित मागण्यासांठी आंदोलन सुरू आहे. कुपोषित बालकांची सेवा करणाऱ्या आशा सेविकांची सरकारला कदर नाही, अशी टीका विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. त्याचबरोबर सरकारने राज्यातील आशा सेविकांच्या मागण्या मान्य कराव्यात. त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी सरकारकडे केली. वाढीव वेतनासह अन्य मागण्यांबाबत जोपर्यंत शासन निर्णय जारी होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवणार असल्याची आशा सेविकांची भूमीका आहे. या आशा सेविकांना सरकारने न्याय दिला पाहिजे. अशी भूमीका वडेट्टीवार यांनी मांडल्यानंतर आशा सेविकांच्या मागण्याबाबत सकारात्मक असल्याचे सरकारकडून स्षष्ट करण्यात आले.

# सुलतानपूर येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपूर येथे कै.साहेबराव पाटील विद्यालय सुलतानपूर येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आले यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत होती. आज दिनांक 24/02/2024 वार शनिवार रोजी कै. साहेबराव पाटील विद्यालय सुलतानपूर येथे इ.10 वि च्या विदयार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला, या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून तालुक्याचे भूमिपुत्र डॉ. बी बी चव्हाण साहेब,शिक्षण उप संचालक नाशिक उपस्थित होते. तसेच मा श्री अनिल पाटील श्रीखंडे मा श्री. हरीयाली फाउंडेशनचे सतीश शुक्ला केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राहणे सर न्यू हायस्कूल वडोद कानोबा मुख्याध्यापक इंगळे सर युनिक पब्लिक स्कूलचे आदित्य गायके सर चंद्रकला उबाळे माध्यमिक विद्यालय साळुंखे सर मा शेख असिफ भाई प्रा चोपडे सर आदी सह सर्व शिक्षकवृंद आदिची उपस्थित होती.



# ‘निवडक कालजयी सावरकर’ पुस्तकाचे आज पुण्यात प्रकाशन

## स्वा. सावरकर यांच्या आत्मार्पण दिनानिमित्त व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या आत्मार्पण दिनाचे औचित्य साधून पुण्यात सोमवार, दि. 26 फेब्रुवारी रोजी ‘निवडक कालजयी सावरकर’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आणि स्वा. सावरकर अभ्यासक अक्षता मानसी माधव देशपांडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. दै. ‘मुंबई तरुण भारत’, ‘महाएमटीबी’ आणि ‘विवेक व्यासपीठ’ संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वा. सावरकर अध्यासन केंद्र, डेक्कन कॉर्नर, कर्वे रोड येथे सायंकाळी 6 ते 8 या वेळेत हा कार्यक्रम पार पडणार आहे. ‘महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था’ पुणे, ‘स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्था’ पुणे आणि ‘विवेक व्यासपीठ’ या सहयोगी संस्थांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी ‘भारतीय विचार दर्शन’चे विश्वस्त प्रल्हाद राठी, स्वा. सावरकर अध्यासन केंद्राचे कार्यवाह महेश पोहनेरकर, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे प्रतिनिधी महेंद्र वाघ, स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्था पुणेचे संस्थापक- अध्यक्ष श्रीनिवास विजय कुलकर्णी, दै. ‘मुंबई तरुण भारत’चे स्पेस सेलिंग सेल्स मॅनेजर आनंद वैद्य आदी उपस्थित राहणार आहेत.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळले; अन् सुटीच्या दिवशी आंदोलन घेतले

## निरेतील मराठा आंदोलकांनी घेतलेल्या 'त्या' आदर्श निर्णयाचे विशेष कौतुक

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राज्यात मराठा आरक्षण प्रश्नी मनोज जरांगे-पाटील यांनी रास्ता रोको आंदोलन करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी राज्यात सर्वत्र मराठा समाज बांधवांकडून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. परंतु निरा, ता. पुरंदर हे शहर मात्र त्यास अपवाद होते. कारण आंदोलने सगळीकडे झाली.परंतु निरेत हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आलेच नाही. याचे एकमेव कारण होते ते म्हणजे शालेय विद्यार्थी...! सद्यस्थितीत बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू असल्याने आपल्या आंदोलनाने विद्यार्थ्यांना या आंदोलनाचा फटका बसू नये. त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. त्यांना परीक्षा केंद्रावर जाताना कोणतीही अडचण येऊ नये. म्हणून हे आंदोलन शनिवारी न घेता रविवारी म्हणजेच सुट्टीच्या दिवशी घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. विद्यार्थ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आलेला हा निर्णय खऱ्या अर्थाने राज्याला आदर्श देणारा ठरलेला असून या आदर्शवादी निर्णया बद्दल निरेतील सकल मराठा समाजाचे विशष कौतुक लोकांकडून होऊ लागले आहे.

शनिवारी आंदोलन न घेता रविवारी आंदोलन का घेण्यात आले. हे जेव्हा अनेकांकडून विचारले गेले तेव्हा मराठा बांधवांकडुन विद्यार्थ्यांच्या परीक्षेबद्दल सांगण्यात आल्याने हे अगदी बरोबर केले, असे सुद्धा लोकांनीच म्हटले. रविवारच्या दिवशी हे आंदोलन संपन्न होत असताना निरेसह पंचक्रोशीतील मराठा आंदोलक हे रास्ता रोको आंदोलनात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन सुट्टीच्या दिवशी हे आंदोलन होत असताना अनेकांनी हजेरी लावली होती.

एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है असा जयघोष करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. निरेच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी पुणे-पंढरपूर मार्गावर दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यावेळी अनेकांनी आपली मनोगते व्यक्त करत तीव्र शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी सुरेश वीर, तुळशीराम जगताप, अजित सोनवणे, मंगेश ढमाळ, कुलदीप पवार, सचिन थोपटे, गणेश थोपटे, पिंटू पटणे, महेश जेधे, दयानंद चव्हाण, टी.के. जगताप, शेखर पवार, अनिल कदम, राजेश चव्हाण,नंदू शिंदे, सचिन मोरे यांच्या सह अनेक मराठा बांधव उपस्थित होते.

यावेळी सचिन मोरे म्हणाले की,मनोज दादा जरांगे पाटील यांच्यावर सकळ मराठयांचा विश्वास आहे. कोणी बारस्कर येतो आणि जरांगे विरोधात आरोप करतो.हे सकळ मराठा समाजाला कदापिही सहन होणार नाही. बारस्करांना माझं सांगणं आहे की, सूर्यावरती थुंकण्याचा प्रयत्न करू नका. थुंकी तुमच्याच अंगावर उडेल.अपशब्द वापरून मनोज जरांगे पाटील यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करू नका. सकळ मराठा समाज हा मनोज जरांगे पाटील यांच्या विश्वासावर आहे. सकळ मराठा समाज जोपर्यंत श्वासात श्वास आहे.तोपर्यंत मनोज जरांगे पाटील यांच्या बरोबरच राहणार. सरकारने मराठा समाजाची फसवणूक केली. म्हणून मनोज जरांगे पाटील ह्यांनी उपोषणाचे हत्यार पुन्हा उपसले आहे. मराठा आरक्षणा संदर्भात जी मूळ मागणी होती ती ओबीसीतून आरक्षण, सगे सोयरे याचा अध्यादेश काढावा. परंतु सरकारने पूर्ण मराठा समाजाची फसवणूक केली आहे. येत्या काळात सकळ मराठा समाज मतदानावर बहिष्कार घालणार आहे, असे सुद्धा सचिन मोरे यांनी म्हटलेले आहे.मराठा समाज बांधवांकडून पोलीस प्रशासनास मागण्यांचे निवेदन देण्यात आले. आंदोलन स्थळी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# सोबलगाव -पाडळी शिवारातील केटी बांध काम निकृष्ट दर्जाचे

## मातीमिश्रित वाळू : सिमेंटचा कमी वापर, बांधकामावर पाणीच मारत नाही



आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव -पाडळी शिवारात श्रीराम मंदिराची शेतजमीन तथा डोंगर पायथ्याशी नाल्यांवर जवळजवळच दोन ठिकाणी कोल्हापूर बांध (केटीबांध) काम मृद संधारण विभागा कडून सुरु आहे. काम निकृष्ट दर्जाचे तथा मातीमिश्रीत वाळु, खडी, दगडी चुरा पावडरचा मोठा वापर व सिमेंटचा कमी वापर करत केटीचे काम अटोपते घेण्याचे काम ठेकेदारकरवी सुरु असुण यासंदर्भात शेतकऱ्यांनी तक्रार करुनही जोरात काम सुरु असल्याचे चित्र आहे. सरकार कडून शेती व शेतकऱ्यांच्या सिंचन क्षेत्रासाठी तथा पाणी आडवा पाणी जिरवा साठी कोटीने रुपये खर्च करुन पाणी आडवण्याची प्रक्रिया बांध कामे करण्यात येत आहे.यात मात्र ठेकेदारांकडून "भर अब्दुला गुड थैली मे" चे प्रयत्न सुरु आहे. जेथे दोन्ही केटी बांध होत आहे तेथे पायात मुरुम असल्याने कामा साठी मजबूती येईल परंतु याचा फायदा घेत माती मिश्रीत वाळु,(तेही नावाला) त्यात वाळु ऐवजी दगडी चुराचा अधिक वापर ,खडी, सिमेंटचा कमी वापर,१२गोणी ऐवजी सहा गोणीचा वापर, केलेल्या कामांवर पाणी न मारणे एक ना अनेक त्रुट्या या कामात असुण काम थातुरमातुर निकृष्ट दर्जाहिन दर्जाचे होत असल्याने लगतच्या शेतकऱ्यांनी तेथील कामगार (ठेकेदार विभागाचे अधिकारी नव्हे)त्यांना निकृष्ट दर्जाच्या कामाबद्दल दैनिकांच्या प्रतिनिधी समोरच सुनावले व काम बंद ठेवण्याची तक्रार- सूचना केली. कामावर ठेकेदार तथा विभागांचे अधिकारी उपस्थित नव्हते यासंदर्भात विभागांचे उपाभियंता यांना थातुरमातुर निकृष्ट दर्जा कामाची फोनवरून संपर्क करुन सूचना तथा अवगत केल्यावर मी प्रत्यक्ष कामांवर येवून चौकशी करतो असे सांगितले.परंतु तेथे कामगार मुकादम या सुचनेकडे दुर्लक्ष करून अधिक जोरानें काम करत थातुरमातुर काम अटोपण्याचा धडका लावला आहे.याकडे वरिष्ठांनी लक्ष घालून हा प्रकार थांबवावा व सरकार व जनतेच्या निधीचा योग्य वापर तथा सिंचन केटीबांधच्या माध्यमातून सेवा बहाल करावी.असी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.

# अली अलाना उर्दू हायस्कूल कुंजखेडा येथे कायदेविषयक जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील कुंजखेडा येथील अली अलाना उर्दू हायस्कूलमध्ये आज रोजी कन्नड न्यायालय अंतर्गत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष कन्नड न्यायालयातील न्यायाधीश श्रीमती मा.श्रीमती ए .आय .आवटी मॅडम होत्या. या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांविषयीची कायदे तसेच पोक्सो कायदा काय असतो? यावर प्रकाश टाकला तसेच दिव्यांग विद्यार्थी कायदा मुली मुले व महिला वरील होणारे अत्याचार याविषयीची कायदे व उपाय -योजना स्पष्ट केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव माननीय मौलाना फारूक रंधेरा साहेबांनी ही मोलाचे मार्गदर्शन केले. शेवटी शाळेचे मुख्याध्यापक श्री शरीफबेग सरांनी शाळेविषयी तसेच शालेय कामकाजा संबंधी मोलाची माहिती दिली तसेच संस्थेची ध्येय धोरणे स्पष्ट केली. सदर कार्यक्रमात कन्नड कोर्टातील वकील तसेच वकील संघाचे अध्यक्ष श्री जाधव साहेब तसेच उपाध्यक्ष एडवोकेट निसार शेख, एडवोकेट शेजवळ साहेब, सचिव एडवोकेट मिसाळ साहेब, चव्हाण मॅडम, संस्था प्रतिनिधी जहीर पटेल सर व शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वृंद व इतर कर्मचारी उपस्थित होते.





# जन भारत रंग नादरपूर येथे उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** नादरपूर, ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर येथे सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय नाट्य विद्यालय च्या 25 व्या वर्धापनदिनानिमित्त " जन भारत रंग " या कार्यक्रमाअंतर्गत श्रीकृष्ण सांस्कृतिक व ग्रामीण विकास संस्था नादरपूर च्या वतीने नादरपूर येथील कलावंतांनी "विकसित भारत" या संकल्पनेवर नाट्य,कलगीतुरा इ. कार्यक्रम सादर केले. या प्रसंगी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम हा सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय नाट्य विद्यालय दिल्ली यांच्या बेबसाईटवर ऑनलाइन अपलोड करण्यात आला. कार्यक्रमास खालील कलावंत हजर होते. 1) सोपान निकम, ज्ञानेश्वर निकम, आजीनाथ निकम, अंकुश निकम, संदीप निकम, पुंडलिक निकम, सोमीनाथ निकम, कारभारी निकम, बाजीराव निकम, धनराज निकम, भाऊसाहेब निकम, किसन निकम, भगवान निकम, सुभाष निकम, सुदाम वाघ, गणेश निकम, आजीनाथ बाबू निकम, बाबासाहेब निकम, शंकर निकम, बापू निकम, कैलास निकम इ. कलावंत हजर होते.

# पोलीस असल्याचे दर्शवून अडीच तोळे सोने लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** पोलीस असल्याचे दर्शवीत व्यापाऱ्याची दिशाभूल करून गळ्यातील साखळी व अंगठी असे अडीच तोळे सोन्याचे दागिने फसवणूक केल्याची घटना देऊळगाव राजा शहरातील धोंडीराज महाराज मठा समोर घडली.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार फिर्यादी हे त्यांच्या दुकानावर जात असताना पत्ता विचारण्याचे कारणाने थांबवून फिर्यादीची दिशाभूल करून पोलीस असल्याची बतावणी करीत फिर्यादी जवळील खिशातील सामान,११ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी,१५ ग्रॅम वजनाची गळ्यातील सोन्याची साखळी असा एकूण अडीच तोळे दागिने किंमत ३५ हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेले. देवेंद्र बाबूलाल जिंतूरकर वय ६७ राहणार जुना सरकारी दवाखाना समोर यांच्या सह्याद्रीवरून पोलिसांनी अनोखी व्यक्ती वय अंदाजे ४० ते ५० वर्ष, रंग काळा सावळा मजबूत बांधा व उंच वर्णनाच्या भामट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. बीट जमादार नायबराव मोगल सदर घटनेचा तपास करीत आहे.

# बैल चोरून नेणाऱ्या संशयिताविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** तालुक्यातील आळंद शिवारातून पाच बैल चोरून नेणाऱ्या संशयित बैल व्यापाऱ्याविरुद्ध पोलिसांनी आज (ता.२५) चोरीचा गुन्हा नोंदविला.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार तालुक्यातील आळंद शिवारात फिर्यादी यांचा एक बैल व साक्षीदार यांचे चार असे ५ बैल किंमत एक लाख ८५ हजार यातील संशयित इसमाने वाहनात टाकून चोरून नेले.प्रकाश कडूबा खार्डे रा.आळंद वय ६३ यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी संशयित बैल व्यापारी शफी रा. पळसखेड झाल्टा याच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविला आहे.

# अज्ञात व्यक्तीने विहिरीत टाकले औषध

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** तालुक्यातील एकबुर्जी येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील विहीरीतून गावातील काही घरांना खासगी नळयोजनेद्वारे पाणीपुरवठा केला जातो. २४ फेब्रुवारीला रात्री अज्ञात इसमाने विहिरीत विषारी औषध टाकले. आज, २५ फेब्रुवारी रोजी सकाळी नळाला पाणी आले असता ते पिवळसर आले व पाण्याचा वास येत असल्यामुळे नागरिकांना संशय आला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. गावातील चाळीस ते पन्नास घरांना खासगी नळ योजनेतून पाणी पुरवठा केला जातो. आज सकाळी ९ वाजता नळांना पिवळे पाणी आल्याने नागरिकांना पाईप लाइन मध्ये काही तरी बिघाड झाल्याचा संशय आला.

# चक्क आंब्याच्या झाडातून टाकले विद्युत तार



## महावितरणचा महाप्रताप; शेतकऱ्याची पोलिसात धाव

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** पाणीपुरवठा योजनेला विद्युत कनेक्शन देताना चक्क आंब्याच्या झाडातून हाय व्होल्टेज विद्युत तार टाकण्याचा महाप्रताप महावितरण कंपनीने केल्याचे उघडकीस आले असून नियोजन शून्येतेचा कळस गाठलेल्या या अजब प्रकाराविरुद्ध शेतकऱ्याने पोलिसात धाव घेतली आहे. सदर प्रकार तालुक्यातील देऊळगाव मही शिवारात गट नं १७४/१ भाग दोन मध्ये घडला असून आंब्याच्या झाडातून टाकलेले विद्युत तार त्वरित काढण्याची मागणी संबंधित शेतकऱ्याने केली आहे.

देऊळगाव मही येथील शेतकरी शेख जुल्फेकार शेख यासीन यांची देऊळगाव माही शिवारात गट नंबर १७४/१ भाग दोन मध्ये वडिलोपार्जित दहा एकर शेती आहे. त्यांच्या शेतात महावितरण कंपनीने सुमारे सहा महिन्यापूर्वी मुख्य वाहिनीचे ८ खंबे रोवले असताना सदर शेतकऱ्यांची कुठली परवानगी अथवा संमती घेण्यात आली नाही. कुठल्या प्रकारचा सर्वे न करता शेतकरी जुल्फिकार शेख यांच्या शेतातून हाय व्होल्टेज विद्युत लाईन टाकण्यात आली असून त्यांच्या शेतातील आंब्याच्या झाडातून टाकण्यात आलेल्या विद्युत तारांमुळे आंब्याच्या झाडाला धोका निर्माण झाला आहे.एकीकडे शासन झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देत असून त्यासाठी दरवर्षी कोट्यावधीचा निधी खर्च केला जात आहे.तर महावितरण कंपनीने सुमारे शंभर वर्षे वय असलेल्या आंब्याच्या झाडातून विद्युत तार टाकून एक प्रकारे आंब्याच्या झाडाचा भग घेण्याचा चंग बांधला आहे. बुलढाणा शहरासाठी मंजूर पाणीपुरवठा योजनेला विद्युत पुरवठा करण्यासाठी आंब्याच्या झाडातून टाकण्यात आलेले विद्युत तार बाजूला वळते करून संबंधित यंत्रणे विरुद्ध कारवाईची मागणी शेख जुल्फेकार यांनी एका तक्रारीद्वारे केली आहे. संबंधित कंपनीने दाखल न घेतल्यास उपोषणाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# वाचन संस्कृती टिकवण्यासाठी वाचकांचा क्लब स्थापन व्हावा : मुनगंटीवार

## चंद्रपूर जिल्हा ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ज्या देशात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यांनी अध्यात्मिक, वैचारिक योगदान देताना वाचन संस्कृतीचे, पुस्तकांचे महत्त्व सांगितले. आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमध्ये मात्र दुर्दैवाने वाचन संस्कृती लोप पावत आहे. ही वाचन संस्कृती टिकवायची असेल तर आपल्याला वाचकांचे क्लब स्थापन करावे लागतील, अशी सूचनावजा अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

शनिवारी (दि.24) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सभागृहात आयोजित जिल्हा ग्रंथोत्सवाचे उद्घाटन करतांना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शरद सालफळे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी रत्नरक्षित शेंडे, रत्नाकर नलावडे, अनिल बोरगमवार, नामदेव राऊत, प्रा. श्याम मोहरकर, सुदर्शन बारापात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'आज या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा. मानसिक भूक भागविण्यासाठी वाचकांचा क्लब स्थापन करण्याचा विचार करावा. उद्या या सभागृहातील ग्रंथोत्सव चांदा



क्लब ग्राऊंडवर होईल, तेव्हा मला अधिक आनंद होईल.' ज्याने फेसबुकला जन्म दिला तो मार्क झुकेरबर्ग छान झाडाखाली बसून पुस्तके वाचतोय आणि आपले भारतीय विद्यार्थी फेसबुकवर व्यस्त आहेत, असे मी काही दिवसांपूर्वी व्हॉट्सएपवर वाचले होते. ही खरे तर आपल्यासाठी विडंबनात्मक स्थिती आहे, असेही ते म्हणाले.

मी आमदार झालो तेव्हा वाचनालय सुरू करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून चंद्रपूर, बल्लारपूर, पोंभुर्णा, मुल व जिल्ह्यात अनेक ठिकाणी वाचनालये सुरू केली. आणखी नवीन वाचनालये सुरू करणार आहे. 2015 मध्ये माझ्या विभागातर्फे जीआर काढून कार्यक्रमांमध्ये 'बुके नव्हे बुक द्या' असा नियम केला. आता जागा अपुरी पडत आहे, इतकी पुस्तके झाली आहेत. हजारो पुस्तके माझ्याकडे आहेत. मी निवृत्त होईल तेव्हा ही पुस्तकेच माझ्यासाठी धावून येतील,' असेही पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले. ग्रंथालयांच्या अंतर्गत सर्व व्यवस्थांमध्ये एकसूत्रता आणण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालये एका सॉफ्टवेअरने जोडली तर अधिक सोयीचे होईल. एखाद्या ग्रंथालयात एखादे पुस्तक नसेल तर महाराष्ट्रातील कोणत्या ग्रंथालयात ते उपलब्ध आहे, हे कळू शकले पाहिजे. त्यावर पुस्तकांना रेटिंग देण्याची सोय असावी. अमेझॉनच्या धरतीवर हे काम करणे शक्य आहे, अशा सूचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केल्या. जिल्हाभरात जनजागृतीसाठी स्पर्धा घेता येतील का, याचाही विचार करावा, असेही ते म्हणाले.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत शरीराच्या तंदुरुस्तीकडे लक्ष द्यावे : पोलीस निरीक्षक कोळी

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच आपल्या शरीराच्या जडण घडणीकडे लक्ष देत शरीर सुदृढतेवर अधिक भर द्यावा, असे आवाहन कोपरगाव ग्रामीण पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने कोपरगाव तालुक्यातील करंजी येथील शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते.

रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य कारभारी आगवन अध्यक्ष स्थानी होते.केंद्र सरकार व महाराष्ट्र शिक्षण परिषदेद्वारा घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केलेल्या करंजी येथील कर्मवीर काळे माध्यमिक विद्यालयातील तेजस गायकवाड, आयुष आगवन, वैभव साळुंखे, गजानन उसरे,श्रेया लांडबिले, हर्षदा पवार, सिद्धी फापाळे, सरस्वती तुपे,निकिता आगवन, वैष्णवी कांबळे,वैष्णवी थोरात तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील कोमल ठाकरे व गायत्री निकम या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष मनीष जाधव, करंजी गावचे लोकनियुक्त सरपंच रवींद्र आगवन, संघाचे उपाध्यक्ष फकीरराव टेके, जिल्हासदस्य जनार्दन जगताप, विनोद जवरे, किसन पवार, सोमनाथ डफळ, अमोल गायकवाड यांच्यासह जेष्ठ नागरिक सांडूभाई पठाण, काळे विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनकर माळी, मुख्याध्यापक अशोक आहेर आदि मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. अध्यक्ष कारभारी आगवन, संघाचे कार्याध्यक्ष विजय कापसे, पत्रकार किसन



पवार, गोदामाईचे आदिनाथ ढाकणे, आदींनी देखील मनोगत व्यक्त करत गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर प्रास्ताविक संघटनेचे तालुकाध्यक्ष मनिष जाधव यांनी करत संघाच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शालेय शिक्षक गजानन सांगळे यांनी तर आभार ललित जगताप यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी राज्य मराठी पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी, कर्मवीर काळे, नागरिक उपस्थित होते.

# खुनाच्या गुन्ह्यात आरोपीस जन्मठेप

## दहा हजारांचा दंड

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** राहाता तालुक्यातील लोणी येथील रहिवासी असलेला नरेंद्र राजेंद्र भोसले व त्यांच्या भाचीवर खुनी हल्ला करून त्यातील नरेंद्र भोसले याच्यावर पुणे येथे उपचार सुरु असताना त्यात त्याचे निधन झाले होते यातील गुंह्यातील कुख्यात आरोपी लाला रंजन भोसले याच्यावर कोपरगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी नुकतीच संपन्न होऊन न्यायालयाने त्यास जन्मठेप व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावणी असून दंड न भरल्यास एक महिन्याची शिक्षा सुनावली असल्याची माहिती सरकारी वकील ॲड अशोक वहाडणे यांनी आमच्या प्रतिनिधीस दिली आहे.त्यामुळे राहाता,कोपरगाव तालुक्यातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

राहाता तालुक्यातील लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रहिवासी व मयत इसम नरेंद्र राजेंद्र भोसले व त्याची भाची कु.स्नेहल कैलास चव्हाण हे दोघे दि.१७ मे २०१८ रोजी जागरण गोंधळाचा कार्यक्रम आटोपून रात्री ८.१५ वाजता आपल्या प्रवरानगर येथील घरी जात असताना त्याच भागातील कुप्रसिद्ध गुंड लाला रंजन भोसले याने त्यांना दोघाना अडवले होते.व त्यांना शिवीगाळ करून मागील भांडणाच्या कारणावरून त्याचे पोटात चाकूचा वार केला होता.त्यात त्यावेळी सदर भांडण सोडविण्यासाठी त्याची भाची कु.स्नेहल चव्हाण हि मध्ये पडली असता तिच्या हातावर त्याने चाकूचा गंभीर वार केला होता. त्यात तिच्या हाताच्या शिरा तुटून ती गंभीर जखमी झाली होती. त्यावेळी फिर्यादी हा केवळ चाळीस फुटावर उपस्थित होता.त्याने हि घटना आपल्या डोळ्याने पाहिली होती.त्याने त्या दोघांना उपचारासाठी लोणी येथील ग्रामीण रुग्णालय येथे भरती केले होते.तर कु.स्नेहल चव्हाण हि गंभीर जखमी असल्याने तिला पुणे येथील ससून रूग्णालयात भरती केले होते.त्यात उपचारा दरम्यान नरेंद्र भोसले याचे गंभीर वार झाल्याने त्यात त्याचे पाच दिवसानंतर दि.२२ मे २०१८ रोजी निधन झाले होते.घटनेनंतर आरोपी लाला भोसले हा त्याचा सहकारी ललित कुंजीर यांच्या दुचाकीवर फरार झाला होता.

दरम्यान त्या बाबत लोणी पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा क्रं.भा.द.वि.कलम ३०२,३२४,३२६,५०४,५०६,३४ प्रमाणे कुणाल राजेंद्र भोसले याने फरार आरोपी लाला भोसले याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

या प्रकरणी लोणी पोलिसांनी कोपरगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालयात आरोपी विरुद्ध आरोप पत्र दाखल केले होते. त्यात सरकारी पक्षाच्या वतीने पंधरा साक्षिदार तपासण्यात आले होते.त्यामध्ये कु.स्नेहल व इतर साक्षिदार,पंच,वैद्यकीय अधिकारी,आदींनी परिस्थितीजन्य पुरावे सरकारच्या वतीने न्यायालयाचे समोर आणले होते.या प्रकरणी जिल्हा व सत्र न्यायमूर्ती बी.एम.पाटील यांचे समोर कामकाज चालले होते.

त्यात सरकारी पक्षाच्या वतीने जोरदार युक्तिवाद करण्यात आला होता.घटना बघणारे साक्षिदार त्यांचे जबाब फिर्यादीचा जबाब,पंचनामे करणारे पंच,वैद्यकीय अधिकारी आदींची साक्ष,परिस्थिती जन्य पुरावा बघून आरोपीस जन्ममठेपेची शिक्षा,व दहा हजारांचा दंड,दंडाची रक्कम न दिल्यास तीन महिन्याची शिक्षा व कलम ३२४ अन्वये पाच वर्ष शिक्षा व पाच हजारांची दंडाची रक्कम न दिल्यास एक महिन्याची शिक्षा सुनावली आहे. दरम्यान या खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने सरकारी वकील अशोक वहाडणे यांनी काम पहिले तर पैरवी अधिकारी म्हणून लोणी येथील तत्कालीन सहाय्यक फौजदार एन.एस.माळी,त्यांना सरकारी वकिलांचे सहकारी श्रीनिवास जोशी यांनी सहकारी केले आहे.या गुन्ह्यात गुंडाला जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलेल्या शिक्षेबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर